CMYK

LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक १११ वा फोन २३०१०१ दिनांक २१ मार्च २०२६ शनिवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501
पाने ६ किंमत ४रु.

## भोंदू अशोक खरात महिलांना गुंगीचे औषध द्यायचा, मुत्र पाजायचा, ब्लॅकमेलींगसाठी व्हीडीओ करायचा, अनेक राजकीय नेत्यांशी संबंध, २०० कोटीची मालमत्ता, झडतीत पिस्तुलही सापडले

# चाकणकरांना आधीच कीक मारुन हाकलायला पाहिजे होतं



मला पहा अन् फुलं वहा

बीड दि.२० (प्रतिनिधी):– संपूर्ण राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामध्ये राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आपल्या अध्यक्ष पदाचा राजीनामा उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीच्या अध्यक्ष सुनेत्राताई पवार यांच्याकडे सुपूर्द केला आहे. खरात आणि चाकणकरांचे अनेक व्हीडीओ गेल्या दोन दिवसांपासून प्रसारमाध्यमांवर धुमाकूळ घालत आहेत. खरं तर राष्ट्रवादीने अगोदरच रुपाली चाकणकरांना कीक मारुन हाकलून द्यायला पाहिजे होतं, परंतु तसं झालं नाही. हे प्रकरण इतकं लहान नाही, चाकणकर एकट्या आढळल्या, मात्र अनेक राजकीय नेत्यांशी खरातचे घनिष्ठ संबंध असल्याचे बोलले जात आहे. आता तपासानंतर याचा दुसरा भाग समोर येणार आहे. एकंदरीत राज्य सरकारमधील अनेक बड्या नेत्यांना अडचणीत आणणारं हे प्रकरण ठरेल अशी चर्चा आहे.



हाच तो भोंदूबाबा अशोक खरात

## सौंदर्यावर अध्यक्षपद द्यायचे होते तर विश्वसुंदरीलाच द्यायचे

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महिला आयोगाचे अध्यक्षपद चाकणकरांना दिल्यापासून त्या वादग्रस्त राहिल्या. अनेक लोकांना पक्षाला अडचणीत यावे लागले. महिला आयोगाचे अध्यक्षपद हे संविधानीक आणि संवेदनशील आहे. ते सौंदर्य पाहून द्यायचे होते तर ते एखाद्या विश्व सुंदरीला दिले असते तरी चालले असते. आता एकट्या चाकणकरांमुळे पक्षाची बदनामी झाली, पक्षाला खाली पहावे लागेल, राजीनामा द्यावा लागला. आणखी प्रकरण कुठपर्यंत जातयं हे येणारा काळ ठरवेल.

## ५८ व्हीडीओ आढळले अनेकांची झोप उडाली

खरात हा महिलांचे लैंगिक शोषण करायचा, भोंदूगिरी करायचा, त्यांना गुंगीचे औषध द्यायचा आणि बलात्कार करायचा. त्यांचे व्हीडीओ बनवून त्यांना सतत ब्लॅकमेल करायचा, त्यामुळे या प्रकरणात कुणी पुढे येत नव्हते. अखेर एका महिलेने पुढे येऊन या प्रकरणाला वाचा फोडली. खरातला अटक झाली. पोलिसांनी तपासाची सुत्रे हाती घेतली आणि ५८ व्हीडीओ असल्याचे निष्पन्न झाले आहेत. यात अनेक राजकीय नेते अडकले जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## कोट्यावधी रुपयांच्या जमिनी, प्लॉट, सोने

खरातला अटक केल्यानंतर त्याच्या सर्व संपत्ती संदर्भातही माहिती गोळा केली जात आहे. नाशिक जिल्ह्यात अनेक ठिकाणी मोक्याच्या जागेवर खरातचे प्लॉट आहेत, जमिनी आहेत ज्याची किंमत कोट्यावधी रुपयांची आहे. नगदी रोख रक्कम आणि सोनेही मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आले असल्याचे बोलले जाते. काही आक्षेपार्ह मटेरियल आणि पेन ड्राईव्हही जप्त करण्यात आले आहेत.



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांनी शुक्रवारी रात्री उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा सुपूर्द केला.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा आणि खरात याचे अनेक व्हीडीओ प्रसारमाध्यमांवर आले. त्या खरातची पूजा करत आहेत, पाय धुत आहेत, कधी त्याच्या डोक्यावर छत्री धरत आहेत, कधी त्याला वाढदिवसाचा केक भरवत आहेत, असे फोटो झळकू लागले. खरातच्या स्थापन केलेल्या ट्रस्टमध्ये चाकणकर या विश्वस्त आहेत. पान २ वर

## भोंदूबाबा अशोक खरातचे ५८ व्हिडीओ कसे समोर आले

नाशिक: राजकारण्यांना स्वप्न दाखवणाऱ्या तथाकथित ज्योतिषी आणि अंकशास्त्रज्ञ अशोक खरात याला बलात्काराच्या गंभीर आरोपांवरून अटक करण्यात आली आहे. अशोक खरातच्या अटकेनंतर राजकीय कनेक्शन समोर आले. या प्रकरणामुळे महाराष्ट्रात खळबळ उडाल्याचं पहायला मिळतंय. स्वत:कडे देवी शक्ती असल्याचा दावा करणाऱ्या भोंदू अशोक खरातचे अश्लील व्हिडीओ समोर आले होते. पण आता प्रकरणाने ट्विस्ट घेतला. २९ डिसेंबरचा फिर्यादी, १८ मार्च रोजी आरोपी झाला. मात्र, अशोक खरातचे ५८ व्हिडीओ समोर कसे आले ? हा प्रश्न अनुत्तरीत राहिला होता. अशातच आता धक्कादायक माहिती समोर आली आहे.

खरातकडे पाच कोटी रुपयांची खंडणी

नीरज जाधवने खरातला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. नीरज आणि त्याच्या काही साथीदारांनी या वादग्रस्त क्लिप्सच्या बदल्यात खरातकडे पाच कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचीही माहिती समोर आली आहे. पण खरातने नीरजच्या धमक्यांना भाव दिला नाही. तुला काय करायचं ते कर.. असं म्हणत त्याने नीरजला फाट्यावर मारलं. त्यानंतर नीरजने पीडित महिलांची मदत घेण्याचा प्रयत्न केला अन् इथंच फास टाकला.

व्हिडीओ मेहुण्याला पाठविला अन खरातची कोंडी

नीरजने शिर्डीतील एका २४ वर्षीय विवाहितेचे मॉर्फ केलेले फोटो आणि व्हिडीओ तिलाच व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवून धमकावलं. या महिलेचं आणि खरातचं बोलणं झालं. नीरज धमकी देत असल्याचं पीडितेने खरातला कळविलं. परंतु, खरातने स्वत:ला वाचविण्यासाठी तिला पोलिसात जाण्याचा मार्ग सुचवला. पान २ वर

### नीरज जाधव प्रकरणाचा मास्टर माइंड

अशोक खरातच्या मर्जीतील ऑफिस बॉय संशयित नीरज जाधव यानेच सगळा गेम केला, अशी माहिती समोर येत आहे. नीरज जाधव हा प्रकरणाचा मास्टर माइंड असल्याचं समजतंय. डिसेंबर २०२५ मध्ये नीरजनेच खरातच्या नकळत महिलांवरील कार्यालयातून ५८ बलात्काराचे सीसी टीव्ही फुटेज ताब्यात घेतले होते. नीरज जाधव अशोकच्या ऑफिसमध्ये काम करत असताना त्याला अशोकच्या काळ्या करारनाम्याचा संशय आला. दुष्कृत्य करूनही खरात समाजात 'साधू' म्हणून वावरत असल्याचे पाहून नीरजच्या मनात पैशांची हाव निर्माण झाली.

## चोर घरात शिरल्याचे कारण आणि खरातची नाट्यमय अटक

खरात हा मोठा मासा होता, त्याला पकडायचे असेल तर खूप गुप्तता पाळायला हवी होती. तो जर निसटला असता तर पुन्हा सापडला नसता म्हणून पोलिसांनी खरातच्या घरात चोर शिरलेला आहे, परिसरात चोरी झाली असा ड्रामा तयार केला. पोलीस त्या बहाण्याने खरातच्या बंगल्यात घुसले आणि एका खोलीत खरात सापडला, त्याला पकडून हॉलमध्ये आणले आणि मग गुन्हा दाखल झालेला असून अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. लगेच मुसक्या आवळल्या आणि जेलमध्ये रवानगी झाली.

## अनेक नेत्यांचे संबंध आता नावे पुढे येणार

खरात प्रकरणामध्ये एकट्या रुपाली चाकणकरांचे नाव आणि फोटो पुढे आले आहेत. मात्र खरातचे अनेक राजकीय नेत्यांशी संबंध असल्याचे बोलले जाते. तसेच राज्यातील प्रशासनामधील अनेक अधिकारीही त्याचे शिष्य असल्याचे बोलले जाते. यात राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना तसेच अन्य पक्षातील नेत्यांबरोबरही त्याचे फोटो आणि व्हीडीओ असल्याची चर्चा आहे. अजुन कोणाची नावे पुढे येतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

## इंजि.रविकांत तुंगार यांचे निधन

बीड दि.२० (प्रतिनिधी):- येथील प्रसिद्ध अभियंते रविकांत तुंगार यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी सकाळी निधन झाले.



बीड शहरामध्ये अनेक मोठमोठ्या वास्तू उभारणीत तुंगार यांचा नावलौकीक होता. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. सुरुवातीला बीड येथे उपचार घेतल्यानंतर छत्रपती संभाजी नगर येथे त्यांना उपचारासाठी हलविण्यात आले होते. छत्रपती संभाजी नगर येथे शुक्रवारी त्यांचे निधन झाले. शुक्रवारी दुपारी बीड येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई, भाऊ असा परिवार आहे. तुंगार कुटुंबावर कोसळलेल्या दु:खात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## माजलगावात गुटख्याची तस्करी

### शहरात गुटख्याची सर्रास बेभाव विक्री

### पोलीस, अन्न प्रशासन विभागाचे दुर्लक्ष

माजलगाव दि.२० (प्रतिनिधी):– राज्यात गुटखा विक्रीवर बंदी असतानाही माजलगाव शहरात खुलेआम गुटख्याची विक्री सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. शहरातील विविध भागांमध्ये चढ्या दराने गुटखा विकला जात असून यामुळे बंदीच्या निर्णयावरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुटख्याची अवैध वाहतूक करण्यासाठी गुटखा विक्रेत्याकडून व्हीआयपी वाहनांचा वापर केला जात आहे. त्यामुळे तपास यंत्रणांना चकवा देत मोठ्या प्रमाणात गुटखा शहरात पोहोचवला जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.
दरम्यान, या सर्व प्रकाराकडे अन्न भेसळ विभाग आणि पोलीस प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. बंदी असताना देखील इतक्या उघडपणे विक्री कशी होते? असा सवाल सामान्य नागरिक उपस्थित करत आहेत. गुटखा विक्रीमुळे तरुण पिढीच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून, कर्करोगासारख्या आजारांचा धोका वाढत आहे. पान २ वर

## डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांना 'रिसर्च प्रोजेक्ट' मंजूर




बीड दि. २० (प्रतिनिधी) :– येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांना आयसीएसएसआर (शिक्षा मंत्रालय भारत सरकार) यांच्या वतीने ६ लाखांचा रिसर्च प्रोजेक्ट मंजूर करण्यात आला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या साहित्याचा आणि समाजकार्याचा अभ्यास आणी संशोधन या प्रकल्प माध्यमातून करण्यात येणार आहे. इंडियन कॉन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च यांच्यावतीने डिसेंबर २०२५ मध्ये मेजर / मायनर रसिर्च प्रोजेक्टसाठी प्रस्ताव मागविण्यात आले. 'मायनर रिसर्च प्रोजेक्टसाठी डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी प्रस्ताव सादर केला.

आयसीएसएसआरच्या वतीने १५ मार्च रोजी प्रकल्प मंजूरीची यादी जाहीर करण्यात आली आहे. डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी सादर केलेला स्वातंत्र्यवीर सावरकर : ए लिटररी लुमिनरी अँड टायटन ऑफ द सोशल रिफॉर्म्स हा प्रकल्प मंजूर करण्यात आला. या प्रकल्पाचा कालावधी १ वर्षांचा असून यामध्ये ६ लाखांचा निधी मिळणार आहे.

- आयसीएसएसआरकडून मिळणार ६ लाखांचा निधी
- स्वा. सावरकरांच्या साहित्य आणि समाजकार्यावर संशोधन करणार

डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर हे सावरकर साहित्याचे अभ्यासक असून त्यांनी आजपर्यंत मागील २५ वर्षात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जीवन कार्य, साहित्य, सामाजिक कार्य, राजकीय प्रवास, पान २ वर

ईद मुबारक



चाँद से रोशन हो
ईद तुम्हारी
इबादत से भरा हो
रोजा तुम्हारा;
हर रोजा और नमाज,
कबूल हो तुम्हारी;
यही अल्लाह से है,
दुआ हमारी!

### रमजान ईद निमीत्त रात्री उशिरापर्यत बाजारपेठ सुरु

बीड दि.२० (प्रतिनिधी):- आज रमजान ईद असल्याने रात्री उशिरापर्यंत शहरातील बाजारपेठ सुरु होती. सर्वत्र उत्साह दिसत होता.

कम्पाउंडर पाहिजे
(महिला किंवा पुरुष)
वेळ : सकाळी 12 ते 04 व संध्याकाळी 07 ते 10
:: संपर्क::
डॉ.जेसवानी (पत्रकार)
Mob.9422240593

## पेठ बीड भागातील बालाजी मंदिरासमोर बेशिस्त वाहनांची गर्दी

### पोलीसांनी लक्ष देण्याची मागणी



बीड दि.२० (प्रतिनिधी):- पेठ बीड भागातील बालाजी मंदिरासमोरील भाग हा नेहमीच रहदारीचा रस्ता असतो. काही ठराविक वाहनधारक हे मात्र त्या ठिकाणी दिवसभर आपली वाहने पार्कींग करून रहदारीला अडथळा निर्माण करतात. यामुळे या ठिकाणी अनेकदा ट्रॅफिक जॅम झालेली असते. या बेशिस्त वाहनांकडे पोलीसांनी थोडे लक्ष द्यावे अशी जनतेतुन मागणी होत आहे. तसेच या ठिकाणी काही व्यापाऱ्यांची दुकाने असुन त्यांच्या दुकानासमोरच ही वाहने उभी केली जातात. आज तर खुद्द पोलिसांचीच गाडी या भागात अशा बेशिस्त वाहनांमुळे अडकली होती. पोलिसांनी वारंवार अनाऊंस करुनही यावर फरक पडला नाही. पान २ वर

## माजलगावात श्रीराम जन्मोत्सव व नारदीय कीर्तन महोत्सव सुरु

माजलगाव दि.२० (प्रतिनिधी):- शहरातील भट गल्ली भागातील श्रीराम मंदिरात रामनवमी निमीत्त श्रीराम जन्मोत्सव व नारदीय कीर्तन महोत्सवाला आज दि.२० मार्च पासुन सुरूवात झाली असुन दि. २६ मार्चला सांगता होणार आहे.
दि.२६ गुरूवारी श्रीरामजन्मोत्सवा निमीत्त अनिता चिंचपुरकर यांचे हरिकिर्तन होणार आहे. यानंतर दुपारी सुंदरकान्ड पठण कार्यक्रम होणार आहे. ता. २७ शुक्रवारी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. याचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंदिराचे विश्वस्त मधुकर रामदासी यांनी केले आहे.

## कायदा जुगार आणि सट्टेबाजीच्या ३०० वेबसाइट आणि अ‍ॅप्सवर बंदी

नवी दिल्ली दि.२० (प्रतिनिधी):- देशातील बेकायदा जुगार आणि सट्टेबाजीच्या वाढत्या जाळ्याला लगाम लावण्यासाठी केंद्र सरकारने मोठी कारवाई करत ३०० अनधिकृत वेबसाइट आणि मोबाइल प्लिकेशन्सवर बंदी घातली आहे. यामध्ये प्रामुख्याने ऑनलाइन स्पोर्ट्स बेटिंग, कॅसिनो, स्लॉट्स, राऊलेट आणि पी-टू-पी बेटिंग प्लॅटफॉर्मचा समावेश आहे. यासोबतच बेकायदा सट्टा आणि मटका चालवणाऱ्या नेटवर्कवरही सरकारने कठोर कारवाई केली असून, खऱ्या पैशांचा वापर करून खेळल्या जाणाऱ्या जुगाराच्या अ‍ॅप्सना ब्लॉक करण्यात आले आहे. ऑनलाइन गेमिंग कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीनंतर सरकारने आतापर्यंत एकूण ८,४०० हून अधिक संशयास्पद वेबसाइट बंद केल्या आहेत. विशेष म्हणजे, यातील सुमारे ४,९०० वेबसाइट या नवीन कायदा अस्तित्वात आल्यानंतरच शोधून काढण्यात आल्या आहेत.

CMYK

# ईद बंधुभाव ,त्याग आणि मानवतेचा पवित्र संदेश

## ईद मुबारक !

**ईद या शब्दाचा अर्थच आनंद , उत्सव आणि समाधान असा होतो . रमजान या पवित्र महिन्यानंतर साजरी होणारी ईद–उल–फितर ही संयम , त्याग आणि ईश्वरभक्तीच्या साधनेनंतर येणारी आनंदाची पहाट आहे . त्यामुळे हा सण केवळ उत्सव नसून तो आत्मशुद्धी आणि कृतज्ञतेचे प्रतीक मानला जातो . रमजान महिन्याचे महत्त्व मोठे आहे . या महिन्यात मुस्लिम बांधव सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत रोजा म्हणजे उपवास करतात . हा उपवास केवळ अन्नत्याग नसून मन , वाणी आणि कृती यांवर नियंत्रण ठेवण्याची साधना आहे . या काळात वाईट विचारांपासून दूर राहणे , गरजू लोकांना मदत करणे , नमाज अदा करणे आणि अल्लाहची उपासना करणे याला विशेष महत्त्व दिले जाते .**

भारत हा विविध धर्म , संस्कृती आणि परंपरांचा संगम असलेला देश आहे . या विविधतेमध्ये एकात्मतेचा धागा घट्ट बांधून ठेवणारे सण म्हणजे भारतीय समाजाचे खरे सौंदर्य होय . प्रत्येक सण हा केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित नसून तो सामाजिक सलोखा , बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारा असतो . इस्लाम धर्मातील सर्वात महत्त्वाचा आणि आनंदोत्सव म्हणून साजरा केला जाणारा सण म्हणजे ईद .

ईद-उल-फितर के पावन अवसर पर आप सभी को हार्दिक शुभकामनाएं ।

यह पवित्र पर्व आपके जीवन में खुशियां , शांति और समृद्धि लेकर आए ।

आपसी प्रेम , भाईचारा और सद्भावना का यह संदेश समाज में सदैव बना रहे ।

रोजा पाळताना उपाशी राहणाऱ्या गरीबांची जाणीव होते आणि समाजातील दुर्बल घटकांप्रती सहानुभूती निर्माण होते . त्यामुळे रमजान हा केवळ धार्मिक विधी नसून सामाजिक संवेदनशीलता वाढवणारा काळ आहे . या पवित्र साधनेनंतर जेव्हा रमजानचा चंद्र मावळतो आणि नवीन चंद्राचे दर्शन होते , तेव्हा ईदचा आनंद साजरा केला जातो . चंद्रदर्शनाची ही परंपरा अत्यंत भावनिक आणि आनंददायी असते . गावोगावी , शहरोगावी चंद्र दिसल्याची बातमी पसरताच वातावरणात उत्साह संचारतो .

ईदच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करून स्वच्छ किंवा नवीन कपडे परिधान केले जातात . पुरुष पारंपरिक पोशाखात मशिदीत किंवा ईदगाहमध्ये नमाज अदा करतात . नमाजानंतर सर्वजण एकमेकांना ईद मुबारक म्हणत मिठी मारतात . ही मिठी केवळ शुभेच्छा नसून मनातील कटुता दूर करून नव्याने नातेसंबंध जोडण्याचा संदेश असतो .

ईदचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे दानधर्म . इस्लाम धर्मात जकात आणि फिटरा यांना विशेष महत्त्व आहे . जकात म्हणजे आपल्या संपत्तीतील काही भाग गरीबांना देणे , तर फिटरा म्हणजे ईदपूर्वी दिले जाणारे दान . यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला सणाचा आनंद मिळतो . कोणीही उपाशी किंवा वंचित राहू नये , हा या परंपरेमागील मुख्य उद्देश आहे . ईद सणामध्ये खाद्यसंस्कृतीलाही विशेष स्थान आहे . शीरखुर्मा हा गोड पदार्थ ईदची खास ओळख आहे . त्यासोबत सेवई , बिर्याणी , कबाब , मिठाई असे विविध पदार्थ तयार केले जातात . घराघरात पाहुण्यांचे स्वागत केले जाते . नातेवाईक , मित्र , शेजारी यांना आमंत्रित करून प्रेमाने जेवण दिले जाते .

ग्रामीण भागात ईद सण अधिक साधेपणाने पण मनापासून साजरा केला जातो . गावातील मशिदीत नमाज अदा केल्यानंतर सर्वजण एकत्र येतात . विविध धर्मीय लोक एकमेकांच्या घरी जाऊन शुभेच्छा देतात . या परंपरेमुळे सामाजिक ऐक्य अधिक दृढ होते . ईद हा सण आपल्याला समानतेचा संदेश देतो . या दिवशी श्रीमंत-गरीब , मोठा-लहान असा कोणताही भेदभाव केला जात नाही . सर्वजण एकाच रांगेत उभे राहून नमाज अदा करतात . त्यामुळे समाजात समानतेची भावना दृढ होते .

आधुनिक काळात ईद साजरी करण्याच्या पद्धतीत काही बदल झाले असले तरी त्यामागील मूल्ये कायम आहेत . मोबाईल , सोशल मीडिया यांच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या जातात . तरीही प्रत्यक्ष भेटून आनंद वाटण्याची परंपरा आजही जपली जाते . ईद हा सण आपल्याला शिकवतो की जीवनात संयम , त्याग आणि सहकार्य या मूल्यांचे महत्त्व काय आहे . जर समाजात परस्पर प्रेम आणि आदर असेल तरच खरी प्रगती साध्य होऊ शकते .

आजच्या काळात समाजात वाढत चाललेल्या तणाव , भेदभाव आणि गैरसमज यांच्या पार्श्वभूमीवर ईदचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो . हा सण आपल्याला सांगतो की धर्म वेगळे असले तरी मानवता एकच आहे .

ईदचा आनंद हा केवळ एका समाजापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे . प्रेम , सहकार्य आणि समानतेच्या भावनेतूनच समाज अधिक मजबूत होतो .

ईद-उल-फितरच्या पवित्र निमित्ताने सर्व मुस्लिम बांधवांना मनःपूर्वक शुभेच्छा देताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की , ईद हा सण आपल्याला बंधुभाव , संयम आणि समाजातील दुर्बल घटकांप्रती संवेदनशीलता यांचा संदेश देतो . रमजान महिन्यातील साधना ही प्रत्येकाला आत्मपरीक्षणाची संधी देते आणि समाजात सकारात्मकता निर्माण करते . त्यांनी पुढे नमूद केले की , सण हे समाजातील ऐक्य वाढविण्याचे माध्यम आहेत . सर्व धर्मीय नागरिकांनी एकमेकांच्या सणांमध्ये सहभागी होऊन सामाजिक सलोखा अधिक दृढ करावा . प्रशासनाच्या वतीने सर्व नागरिकांच्या सुख , शांती आणि समृद्धीसाठी सदैव प्रयत्न केले जातील

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की सजग मन , प्रेमळ विचार आणि एकतेची भावना यांच्यामुळेच समाज सशक्त बनतो . या ईदच्या निमित्ताने सर्वांच्या जीवनात आनंद , आरोग्य आणि समाधान नांदो , हीच मनापासून सदिच्छा .





**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

# राजस्व अभियानातून जनतेचे खरोखर समाधान व्हावे -आमदार क्षीरसागर

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान घाटसावळी येथे उत्साहात संपन्न



बीड दि.२० (प्रतिनिधी):- शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत घाटसावळी येथे दिनांक २० मार्च रोजी आयोजित करण्यात आलेले महाराजस्व समाधान शिबिर नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात आणि उत्साही वातावरणात संपन्न झाले . घाटसावळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसरात पार पडलेल्या या शिबिरामध्ये शेतकरी , ग्रामस्थ , महिला बचत गट , विद्यार्थी तसेच विविध सामाजिक घटकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवित शासनाच्या विविध सेवांचा लाभ घेतला .

राज्य शासनाने महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने हे महाराजस्व अभियान सुरू केले आहे . नागरिकांना महसूल विभागाच्या सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देणे , प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करणे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य हेतू आहे . घाटसावळी येथे आयोजित शिबिराने या उद्दिष्टांना प्रत्यक्षात साकार स्वरूप दिल्याचे चित्र पाहायला मिळाले . आमदार संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते विविध प्रमाणपत्रे आणि कृषी अवजारे यांचे वाटप करण्यात आले आपले मनोगत व्यक्त करताना आमदार क्षीरसागर यांनी नमूद केले की अशा प्रकारचे शासनाचे अभियान म्हणजे नागरिकांसाठी पर्वणीच आहे जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुद्धा हे शिबिर अथवा अभियान हे एक दिवसाचे न करता यातून खरोखर नागरिकांचे समाधान कसे होईल हे पाहणे आवश्यक आहे .

या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी तसेच बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते . कार्यक्रमास तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली . प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे शिबिराला विशेष महत्त्व प्राप्त झाले .

कार्यक्रमास तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे, उपाधीक्षक भूमिअभिलेख अनिल शिवणकर , आरोग्य निरीक्षक अशोक लोखंडे , आरोग्य अधिकारी डॉ. सय्यदा समरीन फातेमा ,राज्य परिवहन महामंडळाचे पंकज गोरे , तलाठी मंडळ अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम आंधळे , बंडू आगलावे , भगवान टाक तसेच बीड तालुक्यातील सर्व महसूल मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , महसूल सेवक आणि तहसील कार्यालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .



पालिहिल रिसार्टला सिंधी समाजा तर्फे भेट देऊन शुभेच्छा देताना डॉ.जेसवानी , महेश टेकवानी ,ईश्वर टेकवानी व प्रेम धायगुडे

## 'धुरंधर २' चा बॉक्स ऑफिसवर धमाका

मुंबई दि.२० :- काही रिपोर्ट्सनुसार, 'धुरंधर २' नं दुसऱ्या दिवशी भारतात अंदाजे ७२.६९ कोटी रुपयांचं कलेक्शन केलं आहे. यासह, अवघ्या दोन दिवसांत या चित्रपटाने भारतीय बॉक्स ऑफिसवर २१८.२४ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. विशेष म्हणजे, कामाचा दिवसअसूनही प्रेक्षकांनी चित्रपटगृहांमध्ये मोठी गर्दी केली होती.मुंबई: बॉलिवूडचा 'एनर्जी किंग' रणवीर सिंह आणि दिग्दर्शक आदित्य धर यांचा बहुचर्चित चित्रपट ' धुरंधर २ : द रिव्हेंज' सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालतोय. गुरुवारी पहिल्याच दिवशी ऐतिहासिक ओपनिंग केल्यानंतर, दुसऱ्या दिवशी म्हणजेच शुक्रवारी २० मार्च रोजी या चित्रपटानं आपली पकड अधिक मजबूत केली असून अनेक मोठे विक्रम मोडीत काढले आहेत.

## बंदी असताना अवैध मार्गानं पाकिस्तानात पाहिला जातोय 'धुरंधर २

मुंबई दि.२० (प्रतिनिधी):- बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंह याचा बहुप्रतिक्षित चित्रपट 'धुरंधर २: द रिव्हेंज' सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. मात्र, या चित्रपटाबाबत एक धक्कादायक बाब समोर आली आहे. आदित्य धरच्या या सिनेमावर काही देशांमध्ये बंदी आहे. पाकिस्तानातही हा सिनेमा बॅन आहे. पाकिस्तानात अधिकृतरीत्या बंदी असतानाही, लाहोरमध्ये या चित्रपटाची पायरेटेड कॉपी पाहिली जात असल्याचा दावा एका व्हायरल व्हिडिओद्वारे करण्यात आला आहे.

पान १ वरून

## भोंदूबाबा अशोक खरातचे व्हीडीओ कसे समोर आले ...

खरातकडून पैसे मिळण्याची शक्यता धूसर झाल्याने नीरजने सिडकोतील २८ वर्षीय विवाहितेचा व्हिडीओ तिच्या मेहुण्याला पाठविला अन खरातची कोंडी झाली. मेहुण्याने या प्रकरणाकडे गांभिर्याने घेतलं अन् पिडितेला धीर देण्याचा प्रयत्न केला अन पोलिसात फिर्याद फिर्यादीसाठी सांगितलं. पिडीतेने मेहुण्याचं म्हणणं ऐकलं अन पोलिसात तक्रार दिली. त्यानंतर भोंदू बाबाचा गेम ओव्हर झाला आहे.

अशोक खरातला अटक

दरम्यान, अशोक खरातविरुद्ध नाशिकमधील सरकारवाडा पोलिस ठाण्यात एका ३५ वर्षीय महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुंगीकारक औषध देऊन अत्याचार केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला असून, १८ मार्च रोजी पहाटे गुन्हे शाखेच्या पथकाने अशोक खरातला ताब्यात घेतलं होतं. आता त्याच्यावर गुन्हा देखील दाखल झाला असून त्याला अटक करण्यात आली आहे.

## चाकणकरांना आधीच कीक मारुन...

या सर्व प्रकरणामध्ये आणखी पक्षाची बदनामी होऊ नये, सरकारचीही बदनामी थांबावी असे प्रयत्न सुरु झाले होते. शुक्रवारी संध्याकाळी रुपाली चाकणकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनी त्यांना राजीनामा द्यायला सांगितले, त्यानंतर चाकणकर देवगिरी बंगल्यावर गेल्या. त्या ठिकाणी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीच्या अध्यक्षा सुनेत्राताई पवार यांच्याकडे त्यांनी राजीनामा सुपूर्द केला. गेल्या दोन दिवसांपासून विरोधकांबरोबरच सत्ताधारी पक्षातील अनेकांनी चाकणकरांच्या राजीनाम्याची मागणी केलेली होती. अखेर हे प्रकरण त्यांना भोवलं आणि त्यांनी शुक्रवारी राजीनामा दिलेला आहे.

## माजलगावात गुटख्याची तस्करी...

त्यामुळे संबंधित विभागांनी तात्काळ कारवाई करून अवैध गुटखा विक्री व वाहतूक थांबवावी, अशी मागणी जोर धरत आहे. प्रकरणी प्रशासन कोणती पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांना 'रिसर्च प्रोजेक्ट' मंजूर...

भाषाशुद्धी लिपी सुधारणा, वैज्ञानिक दृष्टिकोन, या विषयावर एक हजारापेक्षा जास्त व्याख्याने महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेर दिलेली आहेत. 'हर घर सावरकर' उपक्रमातही ते सक्रिय सहभागी आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवन कार्य आणि साहित्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी ते गेले अनेक वर्षापासून सक्रिय आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या साहित्याचे सुसज्ज असे ग्रंथालय त्यांनी निवासस्थानी निर्माण केले आहे. सावरकर कार्यातील योगदानाबद्दल नामांकित संस्थांनी गौरव केलेला आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांत मुळे,कोषाध्यक्ष सत्यनारायण लोहिया, विद्यासभेचे उपाध्यक्ष उमेश जगताप, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ.पि.के. कुलकर्णी, कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे, सर्व प्राध्यापक कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## बालाजी मंदिर समोर बेशिस्त वाहनांची गर्दी

हे वाहनधारक या वर्दळीच्या ठिकाणी वाहने लावून बिनधास्त निघून जातात त्यामुळे या भागातील ही समस्या रोजचीच झाली आहे. कित्येक वर्षापासून ही समस्या सुटायला तयार नाही. संबंधीत विभागाने याकडे लक्ष देऊन कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

व्यापाऱ्यांनी त्यांना याबाबत ही वाहने अशी रस्त्यावर लावू नका असे सांगितल्यास हे वाहनधारक अरेरावीची भाषा करून शिवीगाळ करतात. या ठिकाणी ट्रॅफीक अनेकवेळा जॅम होवुन ये-जा करणाऱ्या वाहनधारकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. काही वेळा या बेशिस्त वाहनांमुळे अनेक गाड्यांचा अपघात देखील झालेला आहे. या उभ्या वाहनातून अचानक एक व्यक्ती बाहेर आल्याने ज्येष्ठ नागरिकाच्या टू व्हीलरने त्यास धडक दिली. त्यामुळे या भागात ड्युटीवर असणाऱ्या ट्रॅफिक पोलिसांनी लक्ष देवुन जरा या बेशिस्त वाहनांवर कारवाई करण्याची मागणी जनतेतुन होत आहे.

News Paper Name - दैनिक पार्श्वभूमी, बीड.
Date - 21/03/2026

CHANGE IN NAME

I declare by this publication about change in my name of

Old Name : Shabbo Mukhtar Shaikh
New Name : Shabana Mukhtar Shaikh

Address : Upali Post, Taluka Wadwani, Dist.Beed - 431131
Mo. No. : 8668435550

16690

पान ६ वरून

## आ.धस यांनी तारकेश्वर गडाचे महंत

तेथे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर व सुधारत असल्याची माहिती मिळाली आहे.भेटीदरम्यान आमदार सुरेश धस यांनी महंतांना आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला दिला. त्यांच्या या भेटीतून सकारात्मक ऊर्जा व मानसिक धैर्य देणारा भाव जाणवल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. परमेश्वराच्या कृपेने त्यांना लवकर पूर्ण स्वास्थ्य लाभावे, अशी प्रार्थनाही यावेळी करण्यात आली.यावेळी काही पदाधिकारी व कार्यकर्ते आमदार धस यांच्यासोबत उपस्थित होते.

## नमो शेतकरी योजनेत पाटोद्यात १ हजार ११२ शेतकरी वंचित राहण्याची भीती

अपेक्षित संख्येपेक्षा हे प्रमाण कमी असल्याचे दिसून येत आहे.फार्मर आयडीमधील त्रुटींमुळे अनेक प्रस्ताव रखडले असून, चुकीच्या नोंदींमुळे काही शेतकऱ्यांचे क्षेत्र जास्त दाखवले जात आहे. योजनेच्या निकषानुसार पाच हेक्टरच्या आत जमीन असलेल्या शेतकऱ्यांनाच लाभ मिळू शकतो. मात्र या त्रुटींमुळे हजारो शेतकरी या योजनेपासून वंचित राहण्याच्या स्थितीत आहेत. लँड शेडिंग प्रक्रिया महसूल विभागाकडे सोपवण्यात आली असून, संबंधित शेतकऱ्यांनी तातडीने अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. कृषी विभागाकडून विविध शिबिरांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली असून, पोखरा योजनेअंतर्गत प्राप्त प्रस्तावांची छाननी सुरू आहे.फार्मर आयडी दुरुस्तीबाबत अद्याप स्पष्ट सूचना प्राप्त झालेल्या नसल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी ओंकार शेळके यांनी दिली.

## महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांची

करुन आस्थेपूर्वक विचारपूस केली.या प्रसंगी महाराजांनी लवकरात लवकर पूर्णतः बरे व्हावे, अशी मनःपूर्वक प्रार्थना व्यक्त करण्यात आली. त्यांच्या या भेटीतून सकारात्मक ऊर्जा आणि मानसिक धैर्य देणारा भाव जाणवला. परमेश्वराच्या कृपेने त्यांना लवकरात लवकर संपूर्ण स्वास्थ्य लाभो, हीच मनःपूर्वक प्रार्थना. तसेच उपस्थित वैद्यकीय तज्ञ डॉ. हर्षवर्धन तन्वर यांच्याशी उपचारांची सद्यस्थिती व पुढील नियोजन याबाबत चर्चा केली. यावेळी ॲड. हनुमंत थोरवे,पत्रकार उत्तम बोडखे, अजिनाथ सानप व इतर मान्यवर उपस्थित होते.

## विवादित महिला आयोगाच्या अध्यक्षाप्रश्री

चाकणकर या भोंदू बाबाच्या ट्रस्टच्या सदस्या तसेच पाठीराख्या असल्याचे समाज माध्यमांमधून समोर येत आहे. याची निश्पक्षपाती पद्धतीने चौकशी करून रुपाली चाकणकर यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा व निष्पक्षपाती चौकशी पूर्ण करून दोषींवर कठोर कारवाई करावी यासाठी जनवादी महिला संघटना व बीड मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाकडून शुक्रवार दि २० रोजी धारूर तहसील समोर निदर्शने करण्यात आली. या प्रसंगी पक्षाचे जिल्हा सचिव कॉ.ॲड. अजय बुरांडे यांच्यासह कॉ.अशोक थोरात, जनवादी महिला संघटनेच्या कॉ. मीराताई शिंदे, काशीराम सिरसाट, संजय चोले, कॉ.लता खोपकर, दादासाहेब सिरसाट, बालासाहेब चोले, धनविर तांबोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## पाटोद्यात गुरुवारी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठी नुकसान

पंचनामे पूर्ण करून शासनाकडे अहवाल सादर करावा. नुकसानग्रस्त शेतकरी व फळबाग धारकांना दिलासा देण्यासाठी तातडीने आर्थिक मदत करावी अशी नगरसेवक संतोष जाधव यांनी केली आहे.

## कनकालेश्वर महोत्सव ही बीडची खरी ओळख–त्रिदशकपूर्ती उत्सवात डॉ.क्षीरसागर

राजराजेश्वरी अष्टकम सादर करण्यात आले तर याच मंचावर विनायक वझे यांच्या मार्गदर्शनाखाली चिमुकल्या मुला मुलींनी मल्लखांबाची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली या सादरीकरणाने प्रेक्षकांचा श्वास रोखायला लावला. रंगकर्मी कुलदीप धुमाळे लिखित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहा सरसंघचालक यांच्या चरीत्रावर आधारित 'अवतरले पंचसंन्यासी योद्धे' ही नाटिका यावेळी सादर करण्यात आली, संघाचे प्रथम सरसंघचालक डॉ.केशव बळीराम हेडगेवार, गोळवलकर गुरुजी, बाळासाहेब देवरस,रज्जू भैया, सुदर्शनजी आणि मोहन भागवत यांचे हुबेहूब दर्शन यावेळी ज्येष्ठ रंगकर्मींनी सादर केले. निखिल देडे आणि त्यांच्या सहकलाकारांनी 'शिवपिंगळा' हा हा लोप पावत चाललेला प्रकार सादर केला . ब्रम्हमुहूर्तावर दारोदारी येऊन जनजागृती करणारा पिंगळा हा लोकलेतील प्रकार असून पहाटे याच समयी पिंगळा हा पक्षी सुध्दा उठून साद घालतो आणि याच वेळी लोककलावंत पहाटे हातात कंदील आणि टाळ घेऊन भक्तीगीते,लोकगीते गायची म्हणून यास 'पिंगळा 'म्हणतात असे सांगून देठे यांनी पोवाडा,गोंधळ आदी प्रकार सादर केले.छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म ते शिवराज्याभिषेक हा संपूर्ण प्रसंग देखील निखिल देडे आणि सहकाऱ्यांनी रसिकांसमोर आणला .शिवपिंगळा म्हणजे काय आणि ही लोप पावत चाललेली संस्कृती जतन करण्यासाठी हे कलाकार घेत असलेली मेहनत या माध्यमातून दिसून आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश तालखेडकर यांनी केले तर प्रास्ताविक आणि आभार प्रांतमंत्री प्रमोद वझे मानले.हा महोत्सव यशस्वी होण्यासाठी जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत सौन्दतिकर,संतोष पारगावकर, डॉ.रवि शिवणीकर,अशोक कुलकर्णी, अनंत सुतनासे,अनिल कुलकर्णी, सुरेश साळुंके गुरु कुलकर्णी, रुक्मिणीकांत पांडव, लक्ष्मीकांत रुईकर ,प्रकाश मानुरकर,महेश देशमुख, लक्ष्मीकांत खडकीकर, सुजित देशमुख, गणेश स्वामी,श्रीपाद देशमुख सुरभी खोपटीकर, स्नेहा पारगावकर,प्रज्ञा वझे,आशा भारती,सोनल पाटील यांनी परिश्रम घेतले.

## तिडके क्युरसी क्लासेसचा शुभारंभ

राज्य पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त शिक्षिका सौ. शोभा तिडके आणि अक्षय तिडके यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले. इंजिनीयर अक्षय तिडके हे गुणवत्ताधारक आहेत. यापूर्वी त्यांनी चार वर्षे क्लासेस चालविले. क्लासेसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दैदीप्यमान यश मिळवून दिले जाईल असा विश्वास इंजि. प्रा. तिडके यांनी व्यक्त केला आहे.

## स्वा.सै.शांतीलाल जसाभाटी यांचे निधन

कार्यकर्ते संजय कोठारी, कांतीलाल कोठारी, विजय कोठारी, राहुल राखेचा,अमोल तातेड, राजेश गांधी, यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

## मराठवाड्यातील सिंचनाचा पैसा भ्रष्टाचाराच्या खिशात–कौशिक

वाटेने नेत्यांच्या खिशात गेल्यामुळे कितीतरी शेतकऱ्यांनी आपले आयुष्य संपवले, असा गंभीर आरोप त्यांनी केला. नेत्यांच्या बिअर कारखान्यांना पाणी मिळते, मात्र शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचत नाही, ही विषमतेची स्थिती त्यांनी मांडली. यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी समाज आणि राजकारण्यांच्या दुटप्पी भूमिकेवर कडक शब्दांत प्रहार केला. बीड जिल्हा सध्या जातीपातीच्या राजकारणाने पेटला असताना,शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मात्र कोणीही एकत्र येताना दिसत नाही, अशी र त्यांनी व्यक्त केली. जातीसाठी आणि धर्मासाठी लाखो लोक रस्त्यावर उतरतात, पण साडेत लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या करूनही शेतकऱ्यांच्या आंदोलनासाठी मात्र साधं सभागृहही भरत नाही, हे महाराष्ट्राचे मोठे दुर्दैव असल्याचे कडू यावेळी म्हणाले.शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढताना आजवर स्वतःवर ८० गुन्हे दाखल झाल्याची माहिती देताना बच्चू कडू भावूक झाले होते.सरकार केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आणि वेळ मारून नेण्यासाठी कर्जमाफीच्या घोषणा करते. २०१५-१६ च्या थकबाकीदारांना न्याय मिळतो, पण २०२५-२६ मधील चालू कर्जदार शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकार मौन बाळगून आहे. जोपर्यंत शेतकरी स्वतःची जात आणि धर्म विसरून 'शेतकरी' म्हणून एकत्र येत नाही, तोपर्यंत सरकारला जाग येणार नाही, असे आवाहन त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना केले.

## विजतार तुटून म्हैस दगावल्या बाबत खटल्यात

यास प्रकरणात रक्कम ३ लाख ६० रुपये व त्यावर ६% वार्षिक व्याज अदा करण्याचे आदेश दिले. तसेच सदर प्रकरणाची नुकसान भरपाई व्याजासह अंदाजे ५ लाख रुपयां पर्यंत पोहोचत असल्याचे. वादीचे विधिज्ञ ॲड. स्वप्निल येवले यांनी सांगितले आहे. सविस्तर असे की वादी रामनाथ माळी यांच्या मालकीच्या तीन म्हशी त्यांच्या घरासमोर शेतामध्ये बांधलेल्या असताना अचानक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे तार तुटून म्हशींचच्या अंगावर पडली व म्हशींचा जागीच मृत्यू झाला. हि घटना वीज वितरण कंपनी यांनी विद्युत तारांची नियमित देखभाल व तारांना गार्डिंग न केल्यामुळे म्हणजे निष्काळजीपणामुळे झाल्याचा आरोप करत वादींनी २०१९ साली गेवराई न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्यासाठी जेष्ट विधीज्ञ स्वप्निल येवले यांच्या मार्फत दावा दाखल केला होता. या प्रकरणात महावितरणकडून योग्य ती खबरदारी न घेतल्याने गंभीर नुकसान झाल्याचा मुद्दा गेवराई न्यायालयासमोर मांडण्यात आला. न्यायालयाने या प्रकरणातील सर्व कागदपत्रे, पुरावे व साक्षीदारांचे जबाब यांचा सखोल व बारकाईने विचार केला. सुनावणी दरम्यान सादर करण्यात आलेल्या पुराव्यांवरून प्रतिवादी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड यांची निष्काळजीपणा स्पष्ट झाल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. न्यायालयाने कंपनीला जबाबदार धरून वादीच्या बाजूने निकाल देत नुकसान भरपाई अदा करण्याचे आदेश दिले. या प्रकरणात वादी शेतकरी रामनाथ सर्जेराव माळी यांच्या वतीने ॲड. स्वप्नील परशुराम येवले यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांनी प्रकरणाचा सखोल अभ्यास करून साक्षीदारांची काटेकोर पडताळणी करुन तसेच कायदेशीर मुद्यांवर ठोस युक्तिवाद सादर केला व प्रकरणात वादींना यश न्याय मिळवून दिला. सदर प्रकरणात ॲड. सुनील शेजुळ यांचे सहकार्य लाभले सदर निकालानंतर पक्षकार तसेच गावातील नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून, ॲड. स्वप्नील येवले यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी



## कांबळे ऋतिक यांची मनूर पोलीस पाटील पदी निवड

माजलगाव दि २०(प्रतिनिधी)- तालुक्यातील मनूर येथील अत्यंत गरीब कुटुंबातील युवक कांबळे ऋतिक पंडितराव यांची गावच्या पोलीस पाटील या पदावर निवड झाली असून त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

मनूर येथील चार युवकांनी या पदासाठी अर्ज केला होता या मध्ये लेखी परीक्षा घेण्यात आली त्या मध्ये या गावातील उमेदवार पेक्षा ऋतिक यास जास्त मार्क मिळाले तसेच तोंडी परिक्षेत ही इतर उमेदवार पेक्षा जास्त मार्क मिळाले म्हणून त्याची या पदावर निवड करण्यात आली असल्याचा आदेश देण्यात आला असून त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे अत्यंत गरीब कुटुंबातील ऋतिक याचे वडील काही वर्षांपूर्वी अपघातात मृत्युमुखी पडले होते. त्यानंतर त्यांनी जिद्दी ने शिक्षण घेतले सध्या तो संभाजीनगर येथे शिक्षण घेत होता. त्याच्या निवडीचे माजी सैनिक संघटना पत्रकार संघ यांनी अभिनंदन केले आहे.

## अवकाळीने शेतकरी दादासाहेब खिल्लारे यांचे कलिंगड पीक उध्वस्त

### तहसीलदारासह आमदाराने केली पाहणी

लिंबागणेश दि २० (प्रतिनिधी) -बीड तालुक्यातील लिंबागणेश परिसरात बुधवारी व गुरुवारी २ दिवस झालेल्या वादळी वाऱ्यासह गारपिटीमुळे पोखरी (घाट) येथील शेतकरी दादासाहेब खिल्लारे यांच्या कलिंगड पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या घटनेची शुक्रवार दि.२० रोजी आ. संदीप क्षीरसागर यांच्यासह तहसीलदार चंद्रकांत शेळके व संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली.

यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, तहसीलदार चंद्रकांत शेळके, मंडळ अधिकारी पंडीत नाईकवाडे, तलाठी प्रमोद कोळपकर, तलाठी गणपत पोतदार, कृषी सहायक रामेश्वर पेजगुडे, महसूल सेवक ललित काकडे तसेच सरपंच बिभिषण मुळीक उपस्थित होते. दरम्यान, शेतकरी दादासाहेब खिल्लारे यांनी सांगितले की, दीड एकर क्षेत्रावर सुमारे दीड लाख रुपये खर्च करून कलिंगड लागवड करण्यात आली होती. गेल्या वर्षी याच पिकातून सुमारे साडेचार लाखांचे उत्पन्न मिळाले होते. मात्र यावर्षी ऐन बहरात आलेले पीक गारपिटीमुळे पूर्णपणे वाया गेले आहे.या पार्श्वभूमीवर महसूल प्रशासनाने वस्तुनिष्ठ पंचनामे करून तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते गणेश ढवळे यांनी प्रसिद्धीसाठी पाठवली.

## बीड शहरातील साठे चौकात उड्डाणपुलाची गरज

## ट्राफिकला आवरतांना वाहतूक पोलीस हातबल

बीड दि २० (गोरखनाथ चिंचोलीकर)- बीड शहरातील पेठ बीड भागातून नवे बीड भागात येण्यासाठी सुभाष रोड तसेच किल्ला ते बलभीम चौक, कारंजा, बशीर गंज, शिव पुतळा असे दोनच तर अलीकडे काही वर्षाखाली झालेला नवा मोंढा ते जालना रोड हा सावता माळी चौकातून जाणारा रस्ता. परंतु बस स्थानक तसेच नगर रोडवरील विविध कार्यालय, सुभाष रोडवरील मार्केटला येण्यासाठी सुभाष रोड हाच महत्त्वाचा रस्ता असल्याने या रस्त्यावरूनच इतर मार्गाच्या तुलनेत ८०% रहदारी दिसून येते. विशेष म्हणजे या रहदारीमुळे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकात वाहनाची एवढी गर्दी असते की मुंगीच्या पावलाने वाहन चालवावे लागते. ट्राफिक पोलिसांनी इशारे करून देखील दुचाकीस्वार फुटभर सापटीतून मार्ग काढतात. बाजूला चार चाकी असेल तर त्याचीच धाक दुख होते. प्रचंड गर्दीमुळे मोठे अपघात होत नसले तरी ही रहदारी पाहता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात आज ना उद्या उड्डाणपुलाची गरज भासणार आहे. या संदर्भात बीडच्या लोकप्रतिनिधीं आणि महसूल व पोलीस प्रशासनाने हा विषय हाताळावा असे आवाहन या निमित्ताने जनतेमधून होऊ लागले आहे.

माहिती अशी की बीड शहराची भौगोलिक व्याप्ती झाली असून लोकसंख्याही त्या तुलनेत मोठी झाली आहे. ही सर्व व्याप्ती आणि लोकसंख्या नुसार रस्ते मोठे असावयाला पाहिजेत परंतु बीड शहरातील दहा वर्षाखालील जे रस्ते आहेत ते तेवढेच आहेत तर प्रत्येक कुटुंबात एक दोन तरी दुचाकी आहेत. तर ३०० टक्के कुटुंबाकडे तिन चार चाकी वाहन असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. कारण कोणत्याही रस्त्यावर पहा पादचाऱ्यांची संख्या अत्यल्प दिसून येते. पेठ बीड भागातून नव्या बीडमध्ये येण्यासाठी मोजकेच मूख्य दोन तिन रस्ते असले तरी सर्वाधिक रहदारीचा रस्ता म्हणून सुभाष रोड कडे पाहिले जाते .

या रस्त्यावर असलेले कापड दुकाने, व मार्केट ही महत्त्वाचे ठिकाणे तर दुसरीकडे शासकीय कार्यालयाकडे जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांचा महत्त्वाचा मार्ग. अशा मार्गावर एवढी गर्दी होत असते की सायंकाळी तर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकातून वळण काढण्यासाठी मार्ग काढणे मुश्किल झाले आहे. अशावेळी ट्राफिक पोलीस देखील हतबल झालेले दिसून येतात. विशेष म्हणजे साठे चौकात सर्व बाजूंनी विशेष करून जालना रस्त्याच्या पश्चिम बाजूस चौकासमोरच मोठ्या प्रमाणात वाहनांची पार्किंग दिसून येते. यामुळे तर रस्ताच राहत नाही. काही वर्षाखाली धुळे सोलापूर महामार्गावरील वाहतूक साठे चौकातून होत होती. तेव्हा साठे चौकात वाहनाखाली चिरडून काही पोलिसातील अधिकारी कर्मचाऱ्यासह नागरिकांचा बळी गेला. तसे यावेळी रहदारीचा प्रश्न चव्हाट्यावर आला . तसा बायपासचा प्रश्न निकाली निघाला. आज धुळे सोलापूर महामार्गावरील वाहतूक बायपास वरून होत असली तरी, बीड शहरातील वाहनांची संख्या आणि अपुरे रस्ते हे लक्षात घेता साठे चौकामध्ये सतत रहदारीची कोंडी होत आहे. ही कोंडी सुटणे शक्य नसल्याने त्यावर एकच उपाय म्हणजे या चौकामध्ये उड्डाणपुलाची आवश्यकता आहे. किमान हा उड्डाणपूल दुचाकी पुरता झाला तरी रस्ता क्रॉसिंगचा प्रश्न निर्माण होणार नाही. केवळ उड्डाणपुलावरून दुचाकी गेल्या तरी चार चाकी तीन चाकी वाहनांना खालचा रस्ता मोकळा होईल. या सदर्भात लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनासह पोलीस प्रशासनाने विचार करणे गरजेचे आहे. साठे चौकात असणारी वाहनांची गर्दी व सतत होत असलेली कोंडी हे लक्षात घेऊन आज ना उद्या लोकप्रतिनिधी, जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाला या संदर्भात दखल घ्यावीच लागणार आहे. असे स्पष्ट मत यासंदर्भात नागरिकांनी व्यक्त केले.

## माजलगाव च्या राजस्थानी मंगल कार्यालयाने न.प.चा ४ लाख ५० हजार रुपयांचा कर भरला

माजलगाव दि.२० (प्रतिनिधी) मार्च एंड मुळे माजलगाव नगरपरिषदेने वसुली मोहीम सुरू केली असून शहरवासीयांनी मालमत्ता कर नळपट्टी कर बांधकाम फीस इतर कर नगर परिषदेला भरणा करून सहकार्य करावे असे आवाहन नगरपालिकेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांनी केले तसे शहरातील राजस्थानी मंगल कार्यालयाने एक मुखी ४ लाख ५० हजार रुपयांचा कर भरणा केल्याबद्दल नगरपरिषदेच्या वतीने राजस्थानी मंगल कार्यालयाचे अध्यक्ष बालकिशन इंदानी यांचा सत्कार करून आभार व्यक्त केले आहे.माजलगाव शहरांमध्ये नगरपरिषदेची वसुली मोहीम सुरू असून माजलगाव च्या राजस्थानी मंगल कार्यालया कडील मालमत्ता कर रुपये ४,५०,००० एक रकमी वसूल करण्यात आला त्यावेळी स्वतः मुख्याधिकारी सुंदर बोंदर हजर होते. त्यांनी मालमत्ता कर भरणा केल्याबद्दल राजस्थानी मंगल कार्यालयाचे अध्यक्ष बालकिशन इंदानी यांचा सत्कार केला त्यावेळी राधेश्याम लोहिया कार्यालयीन अधीक्षक आयुब पठाण वसुली लिपिक चंद्रकांत बुलबुले, सुमित साळवे वसुली सहाय्यक रंजीत रोमन शंकर चव्हाण इत्यादी कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते. तसेच वसुली कामामध्ये स्वतः मुख्याधिकारी यांनी लक्ष घालून मोठाले थकबाकीदार यांना भेटी देऊन कराचा भरणा करण्याबद्दल विनंती केली तसेच कराचा भरणा न केल्यास मालमत्ता सील करण्याची तंबी दिली.

## राज्यसभेच्या ७३ खासदारांविरुद्ध गुन्हे तर सर्वाधिक २७ खासदार भाजपचेच

नविन दिल्ली दि २०( वृत्तसेवा)- - राज्यसभेतील खासदारांपैकी ३६ खासदारांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत. याशिवाय ३१ खासदार अब्जाधीश आहेत. गंभीर गुन्हे असलेल्या खासदारांमध्ये सर्वाधिक २७ खासदार भाजपचे आहेत. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सने (एडीआर) राज्यसभेतील २२९ खासदारांसंदर्भात एक अहवाल जारी केला. त्यात नुकत्याच निवड झालेल्या ३७ खासदारांचीदेखील माहिती आहे.

राज्यसभेत एकूण २४५ सदस्य असतात. त्यापैकी २२९ खासदारांबाबत त्यांनी दाखल केलेल्या शपथपत्राच्या आधारे एडीआरने हा अहवाल तयार केला आहे. त्यानुसार, ७३ खासदारांनी त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल असल्याचे जाहीर केले आहे. यापैकी ३६ खासदारांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. एका खासदाराविरोधात हत्येचा, ४ खासदारांविरोधात हत्येचा प्रयत्न केल्याचा तसेच ३ खासदारांवर महिलांविरोधात अत्याचाराचे गुन्हे दाखल आहेत. भाजपचे सर्वाधिक २७, काँग्रेसचे १२, तृणमूल आणि आपचे प्रत्येकी ४ तसेच माकप आणि बीआरएसच्या प्रत्येकी ३ खासदारांविरोधात गुन्हे दाखल आहेत. तेलंगणातील बीआरएसचे खासदार बंदी पार्थ सराधी यांच्याकडे ५,३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त संपत्ती आहे. त्याखालोखाल आपचे राजेंद्र गुप्ता यांच्याकडे ५,०५३ आणि वायएसआरसीपीचे अयोध्या रामी रेड्डी यांच्याकडे २,५७७ कोटी रुपयांची संपत्ती आहे. ३१ खासदारांकडे १ अब्ज रुपयांपेक्षा जास्त संपत्ती असल्याचे जाहीर केले आहे. त्यात भाजपचे ६, काँग्रेसचे ५, वायएसआरसीपीचे ४, आप आणि बीआरएसचे प्रत्येकी २ तसेच अजित पवार गटाच्या २ खासदारांकडे १०० कोटींपेक्षा जास्त संपत्ती आहे.

## रमजान मुळे बंधुभाव व सामुदायिक ऐक्य निर्माण होते-अमित चिंतामणी

जामखेड दि २०(प्रतिनिधी)- रमजान उपवास (रोझा) केवळ धार्मिक विधी नसून, तो संयम, त्याग, आत्मशुद्धी आणि करुणेचा संदेश देणारा पवित्र काळ आहे. या काळात भूक आणि तहानेची जाणीव ठेवून गोरगरिबांबद्दल सहानुभूती निर्माण केली जाते, ज्यामुळे समाजात बंधुत्व, सामाजिक ऐक्य आणि शांतता दृढ होण्यास मोठी मदत होते असे मत अमित चिंतामणी यांनी व्यक्त केले. हाजी मुख्तार सय्यद मित्र मंडळाच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अमित चिंतामणी, हाजी मुख्तार सय्यद, हाजी नादिर शेख, इम्रान कुरेशी, जाफर सय्यद, मज्जिद पठाण, जमीर सय्यद, आज्जू सुभेदार, माजी नगरसेवक,अर्शद शेख, पत्रकार नासीर पठाण, दानिश पठाण, सुदाम वराट यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी नगरसेवक अमित चिंतामणी म्हणाले की, जगात शांततेसाठी रमजान उपवासाचे महत्त्व आहे. पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत उपाशी राहिल्याने गरिबांच्या भूकेची जाणीव होते, ज्यामुळे श्रीमंत आणि गरिबांमधील दरी कमी होऊन सामाजिक सलोखा वाढतो. रमजानमध्ये केवळ खाण्या पिण्यावरच नाही, तर रागावर आणि वाईट विचारांवरही नियंत्रण ठेवले जाते. या आत्मशिस्तीमुळे मानसिक शांतता मिळते. यावेळी बोलताना हाजी मुख्तार सय्यद म्हणाले की, समाजात एकोपा, सामाजिक सलोखा राहावा तसेच मित्रमंडळीत कायमस्वरूपी जिव्हाळा राहावा यासाठी इफ्तार पार्टीचे आयोजन केले आहे. यावेळी हाजी मुख्तार सय्यद यांनी सर्वांचे आभार मानले. दरम्यान जामखेड शहरातील नांमकीत जनता टेलर नावाचे जामखेड शहरात हाजी मुख्तार सय्यद यांचे दालन आहे. त्यांचे सर्व जाती जमातीच्या लोकांशी सलोख्याचे संबंध आहेत.

त्यामुळे या दालनात दिपावली, दसरा, पाडवा, रमजान, ख्रिसमस या उत्सवात सर्व धर्मीय नागरिक याच दालनातून आपले नवीन कपडे शिवून घेतात हेच खरे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक आहे. अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ पत्रकार सुदाम वराट यांनी व्यक्त केली.

## आ.पंकजभाऊ भुजबळ यांचा वाढदिवस बीडमध्ये विविध उपक्रमाने केला साजरा

बीड दि २० (प्रतिनिधी)- अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे कार्याध्यक्ष तथा विधान परिषद सदस्य आ. पंकजभाऊ भुजबळ यांचा वाढदिवस बीडमध्ये समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस अ‍ॅड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक आणि धार्मिक उपक्रमाने साजरा करण्यात आला आहे. ना. छगनराव भुजबळ यांचे चिरंजीव आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अ‍ॅड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहराचे ग्रामदैवत श्री कंकालेश्वर मंदिर येथे महाअभिषेक व हजरत शेहनशाहवली दर्गा येथे चादर चढविण्यात आली. शहरातील जिव्हाळा शहरी बेघर निवारा येथे अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला. तसेच गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची वाटप करून वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी धनंजय काळे,मंगेश जमदाडे,वैभव गौरे,रणजित सौन्नर, यांच्यासह समता परिषदेचे नूतन पदाधिकारी समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीराम जन्मोत्सव समितीची बैठक संपन्न

बीड दि २०(प्रतिनिधी)- शहरातील पेठ बीड भागातील श्री बालाजी मंदिर येथे गुरुवार दिनांक १९ मार्च रोजी सायंकाळी साडेसात वाजता श्रीराम जन्मोत्सव समिती २०२६ ची बैठक घेण्यात आली यावेळी जन्मोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले..

या बैठकीमध्ये अनेकांनी कार्यक्रमाविषयी आपल्या सूचना नमूद केल्या तर यावर्षीचा २६ मार्च २०२६ रोजीचा चा ''रामनवमी सण''भव्यदिव्य जल्लोषात यशस्वी करण्यासाठी संकल्प करण्यात आला. रामनवमीच्या दिवशी सकाळी बाईक रॅली तसेच मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामाची मिरवणूक बाबत चर्चा करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने हिंदू धर्मीय विविध जातीधर्माचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. असे सर्व बीड शहर आयोजक यांच्यावतीने कळविण्यात आले.

## पाली येथील पीएम श्री शाळेत इफ्तार पार्टी संपन्न

बीड दि २० (प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील मौजे पाली येथील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत राष्ट्रीय एकात्मतेचा सुंदर संदेश देणारी इफ्तार पार्टी उत्साहात पार पडली. शाळेच्या वतीने शालेय विद्यार्थी व मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तारचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत सण साजरा केल्याने परिसरात आनंददायी व सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण झाले.कार्यक्रमाला शालेय समिती अध्यक्षा रोहिणी ताई येवले, सदस्य गीता ताई राऊत, अनिताताई वीर, तसेच शेख



सलीम भाई, असकर भाई, शेख रजुद्दीन, शेख अन्सार आदी उपस्थित होते.मुख्याध्यापक लाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली काब्दे मॅडम, पायके सर, राठोड सर, तळेकर सर, डोंगर सर, आघाव सर, सोळुंके सर, साबळे साहेब, मुंडे मॅडम, म्हैत्रे सर, खाडे सर, जाधव सर, सोनवणे मॅडम, हंगे मॅडम, जगताप मॅडम, मुळे मॅडम व सांगळे मॅडम यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

## श्री क्षेत्र भगवानगडाच्या ९२ व्या नारळी सप्ताहासाठी बडेवाडीत जय्यत तयारी

भगवानगड दि २०(प्रतिनिधी)-श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक महंत वै.ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा यांनी प्रारंभ केलेला ९२ वा नारळी सप्ताह श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या अध्यक्षतेखाली यावर्षी पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी या गावामध्ये मोठ्या भक्तिमयतेने संपन्न होणार आहे. या सप्ताहाचा शुभारंभ मंगळवार ३१ मार्च २०२६ रोजी होत आहे. गावामध्ये सप्ताहाची जय्यत तयारी सुरू असून परिसरातील भाविकांमध्ये प्रचंड उत्साह पहावयास मिळत आहे. एकोणिसाव्या शतकात ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबांनी समाजातील अज्ञानरूपी अंध:कार दूर केला. ऐश्वर्यसंपन्न संत श्री भगवानबाबांचा नारळी सप्ताह म्हणजे लहान-थोर, गरीब-श्रीमंत, विद्वान आणि सामान्यांचं एकत्रीकरण होय. या




भव्य दिव्य सप्ताहासाठी बडेवाडी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर तयारी केली असून भाविकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी, आरोग्यसेवा, वीज, वाहतूक आणि निवास यांचे सुयोग्य नियोजन करण्यात येत आहे. शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, आणि ग्रामस्थ सर्वजण या आयोजनात सक्रिय सहभाग घेत आहेत. या सप्ताहासाठी देशभरातून लाखो भाविक उपस्थित राहणार असल्याने त्या दृष्टीने नियोजन सुरू आहे. या सप्ताहासाठी राज्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व अध्यात्मिक क्षेत्रातील नामांकित मान्यवरांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. आपणही या भव्य दिव्य नारळी सप्ताहाचे साक्षीदार होऊन सप्ताहातील ज्ञानाने आपले जीवन उत्क्रांत करावे असे बडेवाडी ग्रामस्थांतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

## परळीत महादेवाच्या वाघाच्या काठीची व कावडीची मिरवणूक थाटात संपन्न

परळी वै. दि २० (प्रतिनिधी)- प्रभु वैद्यनाथाच्या परळी नगरी मध्ये गुढीपाडव्याच्या शुभ दिनी सायंकाळी जंगम गल्ली मठपती दयानंद त्रिंबक स्वामी यांच्या निवासस्थानापासून शंभू महादेवाच्या वाघाच्या काठीची व कावडीची मिरवणूक उत्साहात धार्मिक वातावरणात काढण्यात आली.

१९ मार्च रोजी गुढी पाडव्याच्या दिवशी सकाळी १० वाजता वाघाच्या काठीचा व कावडीचा विधीवत स्थापना सोहळा पार पडला . त्यानंतर दिवसभर भक्तगण दर्शनासाठी व नैवेद्य दाखवण्यासाठी जंगम गल्लीतील मठपतीच्या घरी येत होते .सायंकाळी ५ वाजता स्वामी (मठपती) परिवार व निवनिर्वाचित नगरसेवक सौ जयश्रीताई मोगरकर, योगश मेनकुदळे व नितीन बागवाले यांच्या हस्ते शंभु महादेवाच्या काठीची व कावडीची पूजा करून महाआरती करण्यात आली. सायंकाळी हजारो भाविकांच्या उपस्थितीत काढलेली वाघाच्या काठीची व कावळीची मिरवणूक जंगमगल्ली , देशमुख गल्ली, गणेशपार , नांदुरवेस, इटके गल्ली, अंबेवेस या पारंपारिक पालखी मार्गाने काढण्यात आली तसे माजी आमदार कै लक्ष्मणराव देशमुख यांच्या वाड्यावर पूजा झाल्यानंतर नियोजित कार्यक्रमा नंतर सांगता झाली.या मिरवणूक सोहळ्यात जंगम समाज , वीरशैव लिंगायत समाज तसेच इतर अनेक शिवभक्त मित्रगण,तरुण वर्ग या शिवभक्तांसह देशमुख पार येथील देशमुख परिवारातील अनेक सदस्यांसह स्वामी मठपती परिवारातील सर्व सदस्यांचा व भक्तगणांचा मोठा सहभाग होता .

## ढोक महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने भगवान श्रीकृष्ण मंदिरावरील सप्ताहाची सांगता

केज दि २० (प्रतिनिधी) -हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत भगवान श्रीकृष्ण मंदिरांचे भुमीपुजन श्री. १००८ स्वामी चिन्मय पुरीजी महाराज व भागवत भुषण ह.भ.प. केशव महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.



यावेळी त्यांनी चुराचुराकर माखन खाया या अभंगावर काल्याचे किर्तन केले. यावेळी अभंगाचे निरुपण करताना ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांनी सांगितले की, मानवी जन्म भाग्याने मिळतो. तो भारत देशात मिळावा तसेच महाराष्ट्रात मिळावा हे परमभाग्य आहे. देव, भक्त व नाम जिथे असेल तेथे काला होतो म्हणून महाराष्ट्रात काला होतो. देवाच्या प्रसाद अधिकारी मानवाला मिळतो म्हणून काला मिळतो असे त्यांनी सांगितले. स्वर्गीय गोपीनाथ राव मुंडे माझ्या किर्तनाला आवर्जून येत होते. ज्ञानेश्वर माऊली व मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त आजही किर्तन सेवा होत आहे. भगवान श्रीकृष्ण मंदिरांचे संपूर्ण स्टील राजाभाऊ घुले व विष्णु भाऊ घुले पुरवणार आहेत तसेच काल्याची पंगतही त्यांनी घेतली आहे. महा विष्णुयज्ञात पवित्र झालेली वीट घरी २०० देऊन भाविकांनी घरी न्यावी या जमा झालेल्या रक्कमेतुन वीटा मंदिर बांधकामासाठी वापरण्यात येणार आहेत असे ह.भ.प. केशव महाराज शास्त्री यांनी सांगितले. आचरण रामाचे करावे तर चरीत्र कृष्णाचे उच्चारावे मागणी केल्या नंतर मिळते ते आश्वासन व न मागता मिळतो तो आशिर्वाद असे ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांनी सांगितले. बाल श्रीकृष्ण चरित्र सांगुन काल्याच्या किर्तनाची सांगता झाली.यावेळी पावनधाम संस्थानचे महंत ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री, रमेशराव आडसकर, युवा नेते रणजीत भैय्या आडसकर, सौरव भैय्या सोनवणे, रमाकांत बापू मुंडे, सुधाकर बापु लांब, अनंतराव घुले, श्रीकांत घुले, शिवराम घुले यांच्या सह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.ह.भ.प. केशव महाराज शास्त्री यांनी सप्ताह यशस्वी केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले आहेत. महाप्रसादाने कार्यक्रम संपन्न झाला.

## रायमोहा येथील रोजा इफ्तार कार्यक्रमाला मा.मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची उपस्थिती

रायमोहा दि.२०(प्रतिनिधी)-शिरूर कासार तालुक्यातील रायमोह येथे आयोजित केलेल्या रोजा इफ्ताहार पार्टीला माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी उपस्थिती दर्शविली तेव्हा सर्व उपस्थित यांच्याशी बोलताना त्यांनी सत्तेत असो अथवा नसो मराठवाड्याच्या प्रश्नासाठी आपण सातत्याने आग्रही भूमिका घेतली आहे. दोन दिवसांपूर्वीच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नाशिक येथे भेट झाली होती. यावेळी मराठवाड्याच्या प्रश्नावर चर्चा करून समुद्राला वाहून जाणारे पाणी मराठवाड्याला मिळावे यासाठी ठोस भूमिका घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी केली असद सेवाभावी संस्था रायमोहा यांच्या वतीने गेल्या २३ वर्षापासून हिंदू मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तार कार्यक्रम आयोजित केला जातो. या कार्यक्रमाचे आयोजक अब्दुल जब्बार खान पठाण, अमानुल्ला खान पठाण, उमरखान पठाण, सुलेमान खान पठाण यांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, सुधाकर मिसाळ, जालिंदर सानप, दादासाहेब मुंडे, भागवत तावरे, सुभाष क्षीरसागर, मदन जाधव, नारायण परजणे, सखाराम मस्के, संजय सानप आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गेल्या २३ वर्षापासून रायमोहा येथे सामाजिक एकतेचे प्रतीक म्हणून पठाण कुटुंबीयांच्या वतीने रोजा इफ्तार कार्यक्रम आयोजित केला जातो. हा सामाजिक सलोखा जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. माझ्या राजकीय जीवनात सर्वधर्म



समभावाला प्राधान्य देऊन प्रामाणिकपणे काम करत आलो आहे. कालच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांची भेट झाली तेव्हा मराठवाड्याच्या पाण्याचा प्रश्न आपण मांडला आहे समुद्राला वाहून जाणारे पाणी आम्ही मागत आहोत. जायकवाडीचा प्रकल्प हा १०२ टीएमसीचा आहे मात्र यामध्ये २३ टीएमसी गाळ आहे. नुकत्याच झालेल्या पावसाळ्यात जायकवाडी प्रकल्पातून १५० टीएमसी पाणी वाया गेले आहे. हे पाणी जर थांबवण्याची प्रक्रिया झाली तर मराठवाड्याच्या अनेक जिल्ह्याचा पाण्याचा प्रश्न सुटू शकतो. तर जातीच्या नावावर सध्या ओळख निर्माण होऊ लागली आहे, हे मोठे दुर्दैव आहे असेही शेवटी ते म्हणाले. याप्रसंगी वसंत काटे, अजिनाथ गवळी, भारत बहीर, महादेव बहीर, नितीन जायभाये, सुधाकर जाधव, सखाराम जाधव, गोकुळ सानप, निजामोद्दीन तांबोळी, प्रभाकर सानप, नवनाथ सानप, भरत जाधव, गुलजार पठाण, प्रकाश इंगळे, गहिनीनाथ पाखरे, ऋषिकेश राऊत, अशोक गवळी, हनुमान सांगळे यांच्यासह शेकडो मुस्लिम बांधवांची उपस्थिती होती.

# आष्टीत विद्युत ग्राहक तक्रार निवारण शिबिराचे आयोजन – कैलास दरेकर



आष्टी दि २० (प्रतिनिधी)- वीज ग्राहकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आष्टी येथे विद्युत ग्राहक तक्रार निवारण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेना चे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी दिली.वीज ग्राहकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आष्टी येथे विद्युत ग्राहक तक्रार निवारण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेना चे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी दिली. महावितरणच्या कामकाजा बाबत वाढत्या तक्रारींमुळे सामान्य नागरिकांमध्ये नाराजी वाढत असून, या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी मनसेने पुढाकार घेतला आहे. सध्या वीज ग्राहकांना स्मार्ट मीटरची सक्ती, अचानक वाढलेली (अवास्तव) वीज बिले, मीटर रीडिंग वेळेवर न घेणे, तसेच मीटरमध्ये वारंवार बिघाड होणे अशा विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. या सर्व समस्यांवर उपाय शोधण्यासाठी आणि ग्राहकांच्या तक्रारी थेट नोंदवून त्यावर कार्यवाही करण्यासाठी हे शिबिर महत्त्वाचे ठरणार आहे. हे शिबिर मंगळवार, दि. २४ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता नगरपंचायत कार्यालयासमोर, कोर्ट रोड, आष्टी येथे पार पडणार आहे. शिबिरात उपस्थित राहून नागरिकांनी आपले तक्रार अर्ज भरावेत, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.मनसेच्या वतीने सांगण्यात आले की, या शिबिराद्वारे सर्वसामान्य ग्राहकांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवून त्यांचे निराकरण करण्यासाठी महावितरणकडे ठोस पाठपुरावा केला जाणार आहे. ग्राहकांना दिलासा मिळवून देणे आणि त्यांच्या हक्कासाठी लढा उभारणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन मनसेचे शेतकरी सेना चे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

## बीडमधील वृत्तपत्रांची ५० लाख रुपयांची जाहिरात देयके १० वर्षांपासून प्रलंबित

# २३ मार्चला डॉ.ढवळे करणार लक्षवेधी आंदोलन



बीड दि.२०(प्रतिनिधी) – जिल्ह्यातील विविध भूसंपादन कार्यालयामार्फत स्थानिक वृत्तपत्रांना देण्यात आलेल्या जाहिरातींची सुमारे ५० लाख रुपयांची देयके गेल्या १० वर्षांपासून प्रलंबित आहेत. प्रशासकीय हलगर्जीपणामुळे मंत्रालयात तांत्रिक त्रुटीच्या नावाखाली हे प्रस्ताव धूळ खात पडले असून, वृत्तपत्रांची होणारी आर्थिक गळचेपी थांबवण्यासाठी आता सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली येत्या सोमवार दि. २३ मार्च जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'लक्ष्यवेधी आंदोलन' करण्यात येणार आहे.

बीड जिल्ह्यातील विविध शासकीय प्रकल्पांसाठी भूसंपादन केले जाते, ज्यांच्या कायदेशीर जाहिराती स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केल्या जातात. मात्र, या जाहिरातींची देयके वेळेवर अदा न केल्याने मोठा डोंगर उभा राहिला आहे. विशेष म्हणजे, सन २०२१ ते २०२४ या काळात भूसंपादन कार्यालयाकडून रोहयो आयुक्तांमार्फत मंत्रालयाकडे पाठवण्यात आलेल्या प्रस्तावांमध्ये काही तांत्रिक त्रुटी काढण्यात आल्या होत्या. मंत्रालयाने हे प्रस्ताव दुरुस्तीसाठी जिल्हा स्तरावर परत पाठवले, मात्र संबंधित कार्यालयांनी या त्रुटी दूर करून प्रस्ताव पुन्हा सादर करण्यात स्वारस्य दाखवले नाही. यामुळे गेल्या ३४ वर्षांपासून हे प्रस्ताव प्रलंबित आहेत.एकीकडे सरकार पारदर्शकतेचा दावा करत असताना, दुसरीकडे बीडमधील प्रशासकीय अधिकारी जाहिरातींची बिले अडवून वृत्तपत्रांची गळचेपी करत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. वारंवार निवेदने देऊन आणि धरणे आंदोलने करूनही केवळ आश्वासनेच मिळाली, प्रत्यक्ष निधी मिळाला नाही. या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी आता 'बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघा'ने पुढाकार घेतला आहे त्यामुळे प्रलंबित ५० लाख रुपयांचा निधी तातडीने मंजूर करावा.मंत्रालयाने काढलेल्या तांत्रिक त्रुटी त्वरित दूर करून प्रस्ताव पुन्हा सादर करावेत.दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून वृत्तपत्रांची आर्थिक पिळवणूक थांबवावी. या मागणीसाठी डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, दि. २३ मार्च २६ २६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येणार आहे. असे प्रसिद्धी पत्रकातून गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी कळविले आहे.

# जागतिक चिमणीदिनी जवळ्यात चिमुकल्यांनी प्रत्येक झाडांवर उभारली पक्ष्यांसाठी पाणपोई



नांदेड दि २०(प्रतिनिधी)- बदलती जीवन शैली, रासायनिक कीटकनाशकांचा अतिवापर, मोबाईलचे टॉवर, रेंज यामुळे चिमण्यांसह अनेक पक्ष्यांच्या जाती नामशेष होऊ लागल्या आहेत. पक्षी ही आपली नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. पक्ष्यांच्या विविध प्रजाती जतन करणे आपले कर्तव्य आहे. झाडांची पानगळ सरली आणि नवी पालवी आली की नव्या नवतीच्या झाडांवर लहान मोठे पक्षी दिसू लागतात. ते नवी घरटी बांधण्याच्या कामालाही लागतात.तसे २० मार्च जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून जवळा देशमुख येथे मुख्याध्यापक ढवळे जी. एस., प्राथमिक पदवीधर शिक्षिका संगिता बडवणे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार यांच्या मार्गदर्शनाखाली चिमुकल्यांनी रानपक्ष्यांसाठी शाळा परिसरातील जोपासलेल्या झाडांवर पाणपोई उभारली आहे.

पशुपक्ष्यांची पाण्यासाठी भटकंती सुरू आहे. या कडक उन्हात पाण्यावाचून प्राणी, पक्ष्यांचा मृत्यूदरही वाढतच असतो. अशातच सतत होणारी अवैध वृक्षतोड, तसेच वाढणारी सिमेंटची जंगले यामुळे पक्षी नामशेष होऊन त्यांचा किलबिलाट लुप्त होत असल्याचे चित्र आहे. एरवी सतत अंगणात येणारी, एवढ्याश्या पाण्यात स्नान करणारी आणि वेळप्रसंगी जेवणाच्या ताटाजवळ येऊन बसणारी चिमणी अलीकडे गायबच झाली आहे. निसर्गसाखळीत प्राणी-पक्ष्यांचं असलेलं महत्त्व ओळखून त्यांचे संगोपन गरजेचे आहे.

जवळ्यातील जि.प. शाळेच्या काही चिमुकल्यांनी आपल्या परसातील झाडांवर छोट्या छोट्या द्रोणांमध्ये तसेच रिकाम्या बाटल्यांचा वापर करून पाण्याची खास सोय केली आहे. यामुळे मुलांची प्राणीमात्रांबद्दल ची मैत्री भावना वाढीस लागल्याचे लक्षात येत असून अनेकांनी चिमुकल्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले आहे. पाखरांना पाणी सहज उपलब्ध व्हावे यासाठी सिद्धांत गोडबोले, सतिश साबळे, विश्वदिप झिंझाडे, अजिंक्य गोडबोले, शाहेद शेख, प्रेम गोडबोले, नामदेव पांचाळ, नागेश मठपती, वीर गोडबोले, राजवर्धन गवारे आदी चिमुकल्यांनी पक्ष्यांसाठी पाणपोई व दाण्याची व्यवस्था करून पाण्यासोबतच पक्ष्यांच्या अन्नसुरक्षेचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.

# गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा –आ.क्षीरसागर



बीड दि २० (प्रतिनिधी) –बीड तालुक्यातील लिंबागणेश, पिंपरनई यासह अनेक भागात गुरुवारी झालेल्या वादळी वाऱ्यासह गारपिटीमुळे कलिंगड, अंबा, गहू पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. याची पाहणी करण्यासाठी शुक्रवारी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह तहसीलदार चंद्रकांत शेळके व संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली.शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करून शासनास सादर करावेत अशा सूचना यावेळी आ क्षीरसागर यांनी दिल्या.बीड तालुक्यात गेल्या दोन दिवसात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारप्टीमुळे फळबाग आणि शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हातातोंडांशी आलेले टरबूज, खरबूज, अंबा, गहू या पिकांना मोठा फटका बसला आहे.याबाबत माहिती मिळताच बीडचे आ संदीप क्षीरसागर यांच्यासह राजेंद्र मस्के (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), तहसीलदार चंद्रकांत शेळके, मंडळ अधिकारी पंडीत नाईकवाडे, तलाठी प्रमोद कोळपकर, तलाठी गणपत पोतदार, कृषी सहायक रामेश्वर पेजगुडे, महसूल सेवक ललित काकडे तसेच सरपंच बिभिषण मुळीक यांनी बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. तर गारपिटीने झालेल्या नुकसानीचे महसूल प्रशासनाने वस्तुनिष्ठ पंचनामे करून तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# भास्कर शिंदे आयोजित इफ्तार पार्टीत हिंदू-मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी




पिंपळवंडी दि.२० (प्रतिनिधी) – पाटोदा तालुक्यातील हांडेवाडी (पिंपळवंडी) येथील शेतीतज्ञ, शेतीनिष्ठ, प्रगतशील शेतकरी भास्कर महादेव शिंदे यांनी प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी गुरुवार दि १९ मार्च रोजी दावत-ए-इफ्तार पार्टीला हिंदू-मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून इफ्तार पार्टीच्या मेजवानीचा आस्वाद घेतला.

हिंदू धर्मियांचा गुढीपाडवा सण व मुस्लिम धर्मियांचा पवित्र रमजान ईद महिना या दोन्ही सणाचा योगायोग याप्रसंगी जुळून आला.या निमित्त हिंदू-मुस्लिम बांधव एकत्र येत या उपक्रमातून सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि सलोख्याचा संदेश दिला. पवित्र रमजान ईद निमित्त पाटोदा तालुक्यातील हांडेवाडी (पिंपळवंडी) येथील शेतीतज्ञ, शेतीनिष्ठ, प्रगतशील शेतकरी भास्कर महादेव शिंदे यांनी प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी गुरुवार दि १९ मार्च रोजी दावत-ए-इफ्तार पार्टीला हिंदू-मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून इफ्तार पार्टीच्या मेजवानीचा आस्वाद घेतला.हिंदू धर्मियांचा गुढीपाडवा सण व मुस्लिम धर्मियांचा पवित्र रमजान ईद महिना या दोन्ही सणाचा योगायोग याप्रसंगी जुळून आला.या निमित्त हिंदू-मुस्लिम बांधव एकत्र येत या उपक्रमातून सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि सलोख्याचा संदेश दिला.या इफ्तार पार्टी मेजवानीला शेख युसूफ सर,लियाकत भाई राज, शेख बाबासाहेब,सय्यद इसाक,शेख शफिक,सलीम सय्यद,माजी उपसभापती दादासाहेब धनवडे, भास्कर शिंदे, संतोष जरे,रमेश पवार फौजी, सुदाम मोरे,बाळू जरे सर,बाबा सरोदे, अमजद शेख सर,देविदास पवार, बाळू पवार,दादा पवार, सुदर्शन पोकळे,शहाबुद्दीन सय्यद, इम्रान राज, तय्यब सय्यद, सोहेल शेख,कलीम सय्यद, तोशिफ शेख,मोहसीन शेख, अरबाज शेख,मयूर राऊत,बशीर शेख,पत्रकार बबनराव उकांडे, भाऊसाहेब पवार,के.टी.पवार यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करा

## ना.पंकजाताई मुंडेंचे जिल्हा प्रशासनाला निर्देश





बीड दि. २०(प्रतिनिधी)- जिल्हयात काल आणि परवा गारपिटीसह झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची ना. पंकजाताई मुंडे यांनी प्रशासनाकडून सर्व माहिती घेतली. बीड, वडवणी, आष्टीसह अन्य तालुक्यालाही कमी अधिक प्रमाणात याचा फटका बसला आहे.शेतातील उभ्या पिकांचे नुकसान झाले आहे. आंबा, टरबूज, मोसंबी या फळबागांचे तर गहू, हरभरा, ज्वारी, कांदा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मळणीसाठी काढून ठेवलेली पिके भिजल्याने त्याचेही नुकसान झाले आहे. अवकाळीमुळे शेतकऱ्यांवर आलेले संकट पाहता या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत असे निर्देश देऊन शासनाच्या संबंधित विभागाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असे ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे.

# पाटोदा येथे श्री स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळा उत्साहात



पाटोदा। श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त शुक्रवार (२० मार्च) रोजी पाटोदा येथील दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. यावेळी भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. परमपूज्य गुरूमाऊलींच्या आशीर्वादाने सकाळी ८ वाजता भूपाळी आरतीने कार्यक्रमांची सुरुवात झाली. त्यानंतर स्वामींच्या मूर्तीवर षोडशोपचार पद्धतीने अभिषेक पूजा करण्यात आली. सकाळी १०.३० वाजता दरबार उत्सव, महानैवेद्य व महाआरती संपन्न झाली. कार्यक्रमादरम्यान सेवामार्गातील बालसंस्कार व समाजोपयोगी १८ विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर सामूहिक हवनयुक्त स्वामीचरित्र पारायण व स्वामी याग करण्यात आला. भाविकांनी घरून आणलेल्या नैवेद्याच्या डब्यांद्वारे सामूहिक अर्पण करण्यात आले. स्वामी यागानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. सायंकाळी ५ वाजता क्रांतीनगर येथील नवीन सेवाकेंद्राच्या जागेत सामूहिक स्वामीचरित्र पारायण आयोजित करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी ६.३० वाजता नैवेद्य आरती करून दिवसाच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# संविधानाचा मान ठेवून भीमजयंतीच्या प्रशासनाने परवानग्या रोखू नयेत ; वंचित बहुजन आघाडीची मागणी

बीड दि २०(प्रतिनिधी)- भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी संपूर्ण बीड जिल्ह्यात मोठ्या उत्साहात भीम जयंती साजरी केली जाते. सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्व असलेल्या या उत्सवात लाखो अनुयायी सहभागी होत असतात. परंतु कोणतेही कारणे दाखवून पोलिस परवानग्या नाकारत असल्याचे समोर येत आहे. तेव्हा संविधानाचा मान ठेवून भीम जयंतीच्या परवानग प्रशासनाने नाकारू नयेत अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे

यंदाच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी, बीड जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात सर्वोच्च न्यायालयाच्या In Re: Noise Pollution (2005) 5 SCC 733 या निर्णयाचा दाखला देत, डेसिबल मर्यादेत डॉल्बी (साऊंड सिस्टिम) वापरण्यास परवानगी द्यावी अशी ठाम मागणी करण्यात आली आहे., भारतीय संविधानातील अनुच्छेद १९(१)(र) व १९(१)(ल) नुसार नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य व शांततामय एकत्र येण्याचा अधिकार आहे. त्यामुळे संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उत्सव साजरा करणे हा पूर्णतः संविधानिक अधिकार आहे.मात्र प्रत्यक्षात काही ठिकाणी पोलीस प्रशासनाकडून डॉल्बी साऊंड सिस्टिमवर पूर्णतः बंदी घालणे, जाचक अटी लादणे किंवा परवानगी देण्यास टाळाटाळ करणे अशा घटना घडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे जयंती उत्सव समित्यांना अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही निवेदनात नमूद आहे.पारंपरिक ढोल-ताशे व सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देत सामाजिक सलोखा टिकवण्याचा प्रयत्नही या उत्सवातून केला जात असल्याचे सांगण्यात आले आहे.वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कमी डेसिबलमध्ये डॉल्बी वापरण्यास परवानगी द्यावी, सर्व पोलीस ठाण्यांना याबाबत स्पष्ट सूचना द्याव्यात, जयंती समित्यांना विनाकारण त्रास देऊ नये, संबंधित पोलीस निरीक्षक व डीवायएसपी यांना योग्य मार्गदर्शन करून परवानगी देण्याचे आदेश द्यावेत, अडथळे निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी केली आहे.



बीड – महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या ९९ व्या वर्धापन दिनानिमित्त शुक्रवार दि. २० मार्च २०२६ रोजी भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, महामानव अभिवादन ग्रुप, सम्राट अशोक शाक्य संघ तसेच बौद्ध उपासक-उपासिका यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन व मानवंदना अर्पण करताना.

# गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर स्वरांजली संगीत विद्यालयाचे उद्घाटन



केज दि २० (प्रतिनिधी)- गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर दि. १९ मार्च २० २६ रोजी केज येथे 'स्वरांजली संगीत विद्यालय'चा उद्घाटन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात पार पडला.

सांस्कृतिक जाणीवा जपणाऱ्या या नव्या उपक्रमामुळे केज परिसरात संगीत शिक्षणाला नवे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी केज नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. सीता ताई बनसोड या होत्या. त्यांच्या हस्ते विधिवत रिबीन कापून विद्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला तालुका अध्यक्षा सौ. शितलताई लांडगे, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा सौ. राधाताई सपकाळ, ज्येष्ठ पत्रकार व समाजसेवक प्रा. हनुमंत भोसले, एमएससीबीचे अधिकारी विष्णू तेलंग तसेच पी.एस.आय. लांडगे साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. ज्येष्ठ पत्रकार धनंजय कुलकर्णी, पार्श्वभूमीचे अभय जोशी, रंजीत घाडगे, विजय बिक्कड, अशोक सोनवणे, प्रदीप गायकवाड, पांडुरंग कसबे, अनिल ठोंबरे, संजीवन कोरडे यांच्यासह अनेक पत्रकारांनी या सोहळ्याला उपस्थित राहून कार्यक्रमाला गौरव प्राप्त करून दिला. सुरुवातीस प्रा. रमेश सरवदे यांनी प्रभावी शब्दांत कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले प्रा. राजकुमार ठोके सर यांचीही या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी संगीत क्षेत्रात करिअर घडवावे, असे मार्गदर्शन केले.कार्यक्रमात प्रा. रमेश सरवदे यांनी आपल्या सुरेल आवाजातून उपस्थित मान्यवर आणि प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमात सांगीतिक रंग भरला आणि वातावरण भारावून गेले.

# धुनकवाड येथे उद्यापासून अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

किल्ले धारुर दि २० (प्रतिनिधी)- धारुर तालुक्यातील धुनकवाड नं.१ येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात उद्या रविवार २२ मार्च पासून भव्य अखंड हरिनाम स्वतःचा प्रारंभ होणार असून याची सांगता शनिवार दि.२८ मार्च २०२६ रोजी होणार आहे.धारूर तालुक्यातील डोंगरपट्ट्यातील धुनकवाड गाव धार्मिक परंपरेसाठी ओळखले जाते. ग्रामदैवत धुनकेश्वराच्या कृपा आशीर्वादाने तसेच वै.ह.भ.प. दत्ता महाराज पिंपळनेरकर, वै.ह.भ.प. रघुनाथ महाराज यादव आणि वै. गुरुवर्य गंगाधर शास्त्री मुळे यांच्या प्रेरणेने गेल्या अनेक वर्षांपासून येथे अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा सुरू आहे. दरवर्षी मोठ्या उत्साहात हा धार्मिक सोहळा पार पडतो.सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम, दुपारी २ ते ५ शिवपुराण कथा व गीता प्रवचन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, तर रात्री ९ ते ११ हरिकीर्तन व त्यानंतर सामुदायिक जागरणाचा कार्यक्रम होणार आहे. दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत ह.भ.प. श्रीराम महाराज शेळके (मोरवडकर) यांच्या सुश्राव्य वाणीतून शिवपुराण कथांचे निरूपण होणार आहे. किर्तन सेवा दि.२२ मार्च २०२६ रविवार रोजी ह.भ.प. श्रीराम महाराज शेळके (मोरवड), दि.२३मार्च सोमवार रोजी ह.भ.प. विष्णू महाराज अंतरकर (गेवराई), दि.२४ मार्च मंगळवार रोजी ह.भ.प. श्रीराम महाराज चोले (खडकी), दि.२५ मार्च बुधवार रोजी विनोदाचार्य ह.भ.प. उद्धव महाराज ठोंबरे (दिंद्रुड), दि.२६ मार्च गुरुवार रोजी ह.भ.प. शिवाजी महाराज गडदे गुरुजी (माजलगाव), दि.२७ मार्च शुक्रवार रोजी विनोदाचार्य ह.भ.प. शिवदास महाराज जंगले शास्त्री (मोठेवाडी) यांची कीर्तने होणार आहेत.तरसप्ताहाची सांगता दि.२८ मार्च शनिवार रोजी ह.भ.प. वसंत महाराज पिंपळनेरकर यांच्या दुपारी १ ते ३ या वेळेत होणाऱ्या सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने होणार असून त्यानंतर सामुदायिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या अखंड हरिनाम सप्ताहासाठी पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन धुनकवाड येथील ग्रामस्थांनी केले आहे.

# लहाने सर्जिकल हॉस्पिटलचा शुभारंभ



बीड दि.२० (प्रतिनिधी) – शहरातील विद्यानगर भागातील डॉ. सुजित दिनकर लहाने यांच्या 'लहाने सर्जिकल हॉस्पिटल'चा शुभारंभ पाडव्याच्या शुभमुहूर्तावर दि. १९ मार्च रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.सदर लहाने सर्जिकल हॉस्पिटलचे उद्घाटन डॉ. सुजित यांचे आई- वडील सौ. अनुराधा दिनकर लहाने व डॉ. दिनकरराव लहाने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आयएमआय चे अध्यक्ष डॉ. अनंत मुळे, डॉ. बी.आर. पंडित, प्रा. पी.आर. गंडाळ, प्राचार्य ए.आर. पाटील, डॉ. के. बी. पैठणकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन शेकडे, जालना येथील प्रसिद्ध डॉ.सतीश देविदास शेकडे, डॉ. राधेश्याम जाजू आदींची उपस्थिती होती. हॉस्पिटलच्या शुभारंभ च्या निमित्ताने माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आ.संदीप क्षीरसागर भाजपाचे जेष्ठ युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर आदींसह डॉक्टर, इंजिनीयर, पत्रकार, सामाजिक, राजकीय व वैद्यकीय क्षेत्रातील विविध मान्यवर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास नातेवाईक व मित्रपरिवार यांची उपस्थिती होती. लहाने सर्जिकल हॉस्पिटलच्या समारंभाच्या निमित्ताने उपस्थित सर्वांचे स्वागत डॉ. दिनकर लहाने, इंजी. अभिजीत लहाने, डॉक्टर सुजित दिनकर लहाने यांनी स्वागत केले.

# चार चिमुकल्यांनी केले महिन्याभराचे रोजे पुर्ण



आष्टी २०(प्रतिनिधी)- मुस्लिम धर्मातील पवित्र असलेल्या रमजान महिन्याचा आरंभ १९ फेब्रुवारी झाला. या पवित्र रमजान महिन्याचा पहिला रोजा शुक्रवार दि. २० फेब्रुवारी रोजी होता. हा पहिला रोजा कडा येथील जन्नत नासीर पानसारे वय ११११ वर्ष, मन्नत वसीम पानसारे वय ११ वर्ष, असद अनिस मोमीन वय ११ वर्षं, आणि शोयब जहाँगीर सय्यद वय १३ वर्ष, या चार चिमुकल्याने रोजा पुर्ण केला. पहिला रोजा धरला त्यात या चारही चिमुकल्याना काही विशेष त्रास जाणवला नाही. म्हणून त्यानंतर यांनी नियमितपणे दररोज रोजा धरत या महिन्याचा आजचा शेवटचा म्हणजे ३० वा रोजा धरत आज या चारही चिमुकल्यांचे महिन्याभराचे रोजे पुर्ण झाले आहेत. मागील पाच वर्षांपासून रमजानचा महीना उन्हाळ्यात येत आहे. यामध्ये रोजा पुर्ण करणे म्हणजे एक आश्चर्य समजले जाते. त्यात या चिमुकल्यांनी सर्वच ३० रोजे पुर्ण केले.

# २१ मार्च आंतरराष्ट्रीय वन दिवस

जगातील वन क्षेत्र संरक्षित रहावे व जंगलातील संपूर्ण जीवजंतूंचे संरक्षण व्हावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र महासभाने २०१२ ला २१ मार्च हा दिवस ''आंतरराष्ट्रीय वन दिवस'' साजरा करण्याची घोषणा केली.तेव्हापासुन जगात २१ मार्चला आंतरराष्ट्रीय वन दिवस साजरा केला जातो.राष्ट्रीय वन अहवाल २०२३ च्या माहितीनुसार वनक्षेत्राच्या बाबतीत देशासह राज्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक स्थितीत येवून ठेपली आहे.कारण देशात फक्त २१ टक्के व राज्यात फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचा खुलासा राष्ट्रीय वन अहवालात केला आहे ही अत्यंत गंभीर व धोकादायक बाब आहे.आज निसर्गावर सर्वंच काही अवलंबून आहे.आज निसर्ग आहे म्हणून सृष्टी आहे. निसर्गाची संपूर्ण जळमुळ वनक्षेत्रावर अवलंबून असते.वनक्षेत्र म्हणजेच वृक्ष,परंतु आज वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजातीने स्वतःच्या स्वार्थासाठी कुऱ्हाड चालवून घनाघाती प्रहार केला आहे.आज देशाचा विचार केला तर फक्त २१ टक्के वनक्षेत्र आहे म्हणजे मानवजातीसह संपूर्ण जीवसृष्टीसाठी धोक्याची घंटा आहे.घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होवून ग्लेशियर वितळणे,भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,भुस्खनन, अती उष्णता, अती पाऊस, सुनामी, समुद्राची पातळी वाढणे अशा भयावह घटना दिवसेंदिवस वाढतच आहे.आजच्या परिस्थितीत आंतरराष्ट्रीय नियमांनुसार प्रत्येक देशाचे वनक्षेत्र कमीत कमी ३३ टक्के असने गरजेचे आहे.परंतु आज भारतात फक्त २१ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचे सांगितले जाते व महाराष्ट्राचा विचार केला तर फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक आहे. म्हणजेच राज्यासह देशातील वनक्षेत्र भरपूर पिछाडीवर आहोत.महाराष्ट्रात फक्त १६ टक्के वनक्षेत्र म्हणजे मोठी धोक्याची घंटा आहे.देहरादून येथील ''फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया'' या संस्थेने नुकताच २०२३ चा राष्ट्रीय वन अहवाल (आयएसएफआर) दिल्ली येथील वन आणि पर्यावरण मंत्रालयाकडे सादर केला.हा अहवाल देशातील वनसंपत्ती आणि संसाधनावरील प्राथमिक माहितीच्या आधारावरचा मूल्यांकन अहवाल मानला जातो.

वनक्षेत्राच्या बाबतीत देशातील राज्यात समतोल नसल्याने वनक्षेत्र घटतांना दिसते. आज आपण पहाले तर देशातील आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ,ओरिसा, तेलंगणा,या राज्यातील वनक्षेत्र गेल्या दोन वर्षांत वाढले आहेत.तर घनदाट जंगलाच्या बाबतीत ज्या राज्यांची गणणा होते अशा मिझोराम, नागालँड, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मेघालय या राज्यातील वनक्षेत्र घटले आहे ही चिंतेची बाब आहे.इतर राज्याच्या तुलनेत जर महाराष्ट्राचा विचार केला वनक्षेत्राच्या बाबतीत अत्यंत निचकांक असुन गंभीर परिस्थितीत असल्याचे दिसून येते.त्यामुळे वनक्षेत्राच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.कारण वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजाती, पशुपक्षी व जीवजंतू यांची दिनचर्या अवलंबुन असते.त्यामुळे वनक्षेत्र सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षिर हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारा पाहिजे.आज संपूर्ण देशाचा विचार केला तर वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत आणण्यासाठी १२ टक्के वनक्षेत्र वाढविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी सरकारने व सामाजिक संघटनांनी पुढाकार घेतला पाहिजे.त्याचप्रमाणे आज राज्यात ३३ टक्क्यांपर्यंत वनक्षेत्र आणण्यासाठी १७ टक्के वनक्षेत्र वाढविण्याची मोठी जबाबदारी राज्य सरकारने स्विकारली पाहिजे.वनक्षेत्र वाढले नाही तर दिवसेंदिवस बदलत्या हवामानात आणखी भर पडुन भयावह परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही. त्यामुळे वृक्ष लागवड काळाची गरज आहे. आज घटत्या वनक्षेत्रामुळे जंगली पशुपक्षी याचे हाल बेहाल होत आहे व त्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.आपण रोज मिडियाच्या माध्यमातून पहात असतो की,गावात, शहरात, कोणाच्या घरात,रोडवर हिंसक प्राणी(वाघ, बिबट्या,अस्वल इत्यादी) मोठ्या प्रमाणात वावरतांना दिसतात.याला संपूर्ण मानवजाती जबाबदार आहेत.देशात हत्ती कर्नाटक व ओरिसा राज्यात सर्वाधिक आहे म्हणजेच जगभरात असणाऱ्या हत्ती पैकी ६० टक्क्यांहून अधिक हत्ती भारतात आहे. परंतु जंगल कटाईमुळे व वनक्षेत्राच्या घटत्या परिणामामुळे हत्तीचे कळप आपल्याला इतरत्र राज्यात येतांना दिसतात.यामुळे या महाकाय प्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.जंगल कटाईमुळे वन्यप्राण्यांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.ओडिशात गेल्या ११ वर्षांत ८५७ हत्तींचा मृत्यू अपघात, आजार, शिकार , विजेता झटका यामुळे त्यांचा मृत्यू झाला.अशाप्रकारे वन्यप्राण्यांवर मानवी अत्याचार वनक्षेत्र घटल्याने होत असल्याचे दिसून येते.घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होवून देशातील प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अमेरिकेच्या हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने ''स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२४'' हा अहवाल सादर केला आहे.त्यात दावा करण्यात आला आहे की भारतातील वायुप्रदूषण अतिशय चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. वायुप्रदुषणामुळे जगभरातील मृत्यूच्या तुलनेत २५ टक्के मृत्यू भारतात होतात म्हणजेच भारत वायुप्रदूषणच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे दिसून येते आणि ही गंभीर बाब आहे याला रोखण्यासाठी वनक्षेत्र वाढविण्याची नितांत गरज आहे व संपूर्ण स्तरातुन वृक्षलागवड मोहीम युद्धपातळीवर राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे.जय हिंद!

– लेखक –
**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
नागपूर मो.नं.९९२१६९०७७९

## धनगर जमातीच्या एस टी आरक्षण अंमलबजावणीसाठी मुंबईच्या उपोषणात सहभागी व्हा – आबुज, गवते

माजलगाव (प्रतिनिधी) : तालुक्यातील व बीड जिल्ह्यातील धनगर जमातीला आव्हान करण्यात येते कि धनगर जमातीच्या एस टी आरक्षण अंमलबजावणी साठी मुंबई येथील आझाद मैदान येथे मल्हार योद्धे दिपक बोराडे उपोषणाला बसलेले आहेत. भाऊंनी सर्व समाजाला आव्हान केले आहे की सर्व कामे आवरून सर्व समाज बांधवांनी २३ तारखेला सकाळी ९ वाजता मुंबईच्या आझाद मैदान येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे २३ तारीख भाऊचा उपोषणाचा ८ दिवस पण समाज बांधवांना एक विनंती आहे भाऊची तब्येत जर खूप बिघडली तर याला जबाबदार आपण सर्व धनगर समाज बांधव असणार आहोत कारण भाऊ आपली वाट ज्याप्रमाणे एक बाळ आपल्या आईची वाट बघते त्याप्रमाणे दीपक भाऊ तुमची वाट बघत आहेत, माझा समाज आज तरी आझाद मैदानावर येईल उद्या तरी येईल परवा तरी येईल अशी आशा दीपक भाऊं बोराडे यांना लागलेली आहे, दिवस मावळेपर्यंत दीपक भाऊ आपल्या समाजाची वाट एखाद्या लेकराप्रमाणे बघत आहेत आहेत ,मैदानात संख्या दिसल्याशिवाय सरकार झुकणार नाही, आणि सर्टिफिकेट दिल्याशिवाय भाऊ माघार घेणार नाहीत ,लढाई ही समाज बांधवांच्या हातात आहे कधी जिंकायची ते त्यामुळे सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने दि. २३ तारखेला आझाद मैदान मुंबई येथे उपस्थित राहावे असे आवाहन मुक्तीराम आबुज, कल्याण गवते यांनी केले आहे

## पाटोदा पोलीस ठाण्यात अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांची भेट



पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी शुक्रवार, २० मार्च रोजी पाटोदा पोलीस ठाण्याला भेट देत विविध कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांच्या हस्ते पोलीस ठाणे परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

भेटीदरम्यान पांडकर यांनी पोलीस ठाण्याच्या दैनंदिन कामकाजासह कायदा व सुव्यवस्था विषयक बाबींवर सविस्तर चर्चा केली. तसेच प्रलंबित कामांचा आढावा घेऊन आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या प्रसंगी पोलीस निरीक्षक विनोद घोळवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक भगवान भाबड, पोलीस उपनिरीक्षक शैलेश पवार, पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब वाघ उपस्थित होते. तसेच नगराध्यक्ष राजूभैय्या जाधव, पाटोदा पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, सचिव ॲड. महेश बेदरे यांच्यासह पोलीस कर्मचारी रियाज पठाण, पवळ, राणी मेंगडे, मॅडम पवार, कोळेकर आणि इतर अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

## काडीवडगावच्या शनिदेव व मारुती मंदिरात प्रति अमावस्या सोहळा उत्साहात



माजलगाव (प्रतिनिधी) : शहरापासून जवळच असलेल्या काडीवडगाव येथील शनिदेव व मारुती मंदिरात दर महिन्याला येणाऱ्या अमावस्येनिमित्त आयोजित करण्यात येणारा धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धा व भक्तीभावाने दर्शन घेत आहेत.

यावेळी ह भ प कल्याण नाना शेंडगे, सटवा आप्पा काळे, नाथा महाराज, शिवाजी घायतीडक, त्रिंबक फपाळ, बाबासाहेब म.कर्डिले, भगवान गोपाळ, गवते आप्पा, अशोक मेंडके, महादेव धपाटे, घनश्याम पांचाळ, नारायण पवार, गावडे नाना, तुळशीराम वैराळे, महाराज शिंगणे, प्रल्हाद फपाळ, उद्धव फपाळ, चैतन्य बादाडे, मृदंगाचार्य विष्णू महाराज बादाडे, विठ्ठल क्षीरसागर, कृष्णा जाधव, बालासाहेब पांचाळ, पवन धपाटे इत्यादी उपस्थिती होती व महिलाही मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. अमोशाचे अन्नदाते आदिनाथ महाराज फपाळ व कार्यक्रमाचे संयोजक विक्रम राऊत इत्यादी उपस्थित होते. अमावस्येच्या दिवशी पहाटेपासून मंदिरात अभिषेक, पूजाअर्चा, शनि महाराजांची विशेष पूजा तसेच मारुतीरायांची आरती करण्यात येते. दिवसभर हरिनाम सप्ताह, भजन-कीर्तन, तसेच प्रवचनांचा कार्यक्रम आयोजित केला जातो. महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## वाकनाथपूर येथे पोलीस पाटीलपदी बालासाहेब गांडगोळे यांची नियुक्ती

पिंपळनेर दि २० (प्रतिनिधी) : जिल्ह्यातील पोलीस पाटील पदासाठी गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेली निवड प्रक्रिया अखेर पूर्ण झाली असून दि. १७ रोजी निकाल जाहीर करण्यात आला. कडक नियमांचे पालन करत पार पडलेल्या या प्रक्रियेत बीड तालुक्यातील वाकनाथपूर येथील बालासाहेब पांडुरंग गांडगोळे यांची गावच्या पोलीस पाटीलपदी नियुक्ती झाली.

सर्वसाधारण कुटुंबातून पुढे आलेल्या गांडगोळे यांनी ८३ टक्के गुण मिळवत पोलीस पाटीलपदी निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशाबद्दल परिसरातून सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

गांडगोळे यांच्या निवडीमुळे वाकनाथपूर गावाच्या प्रशासनाला सक्षम नेतृत्व मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. तसेच गावातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी ते प्रभावीपणे काम करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान जिल्ह्यामध्ये जेवढ्या गावच्या पोलीस पाटीलपदी प्रथम क्रमांकाने सदर निवड झाली असली तरी निवड झालेल्यांची कागदपत्र पडताळणी पर्यंत ही तात्पुरती निवड असल्याचे यासंदर्भात जिल्हा प्रशासनाकडून प्रसिद्ध केलेल्या निवड यादी मध्ये नमूद करण्यात आले आहे.



**बीड शहरातील कॅनॉल रोडवर डॉ.पैठणकर दवाखान्याच्या समोर नव्यानेच सुरू करण्यात आलेल्या पारकर कपड्याच्या दुकानाचा शुभारंभ पाडव्याच्या शुभदिनी झाला. यावेळी राम कदम यांचा सत्कार करण्यात आला. तर ज्ञानेश्वर राम कदम, पांडुरंग राम कदम यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी सरपंच रोहिदास चव्हाण, लक्ष्मण क्षीरसागर अण्णा, रामदास पवार, पत्रकार नारायण नागरे आदी उपस्थित होते.**

## पाडव्यानिमित्त नगरसेवक गोविंद शिराळे यांच्या एमआयडीसी भागात गाठीभेटी

बीड दि २० (प्रतिनिधी) : नवीन हिंदू वर्ष गुढीपाडव्याच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथअण्णा शिराळे पाटील यांनी त्यांचे ज्येष्ठ सुपुत्र तथा बीड जिल्हा सत्र न्यायालयातील वकील तथा बीड नगर परिषदेचे स्विकृत नगरसेवक गोविंद शिराळे पाटील यांनी एमआयडीसी भागातील अयोध्या नगर येथे नवनाथ शिराळे पाटील मित्र परिवारातील सर्वासह कुलकर्णी कुक्कडगावकर परिवाराच्या घरी भेटी दिल्या तेव्हा मनस्वी शुभेच्छा दिल्या यावेळी सर्व परिवाराच्या निवासस्थानी त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मनस्वी कुलकर्णी कुक्कडगावकर परिवाराच्या वतीने बीड शहरातील प्रश्नसंदर्भात नगरसेवकासह शिराळे यांना माहिती देऊन चर्चा केली. यावेळी बीड नगर परिषदेचे माजी नगरसेवक बाबुराव परळकर तसेच कुक्कडगावचे प्रतिष्ठित नागरिक प्रल्हाद शिंदे पाटील तसेच पत्रकार किशोर देवा कुलकर्णी, कुक्कडगावकर सह उपस्थित असलेले संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह मान्यवर उपस्थित होते .

## अवकाळीने झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या–प्रा.बबनराव आंधळे

बीड दि २० (प्रतिनिधी) : जिल्ह्यात बुधवारी- गुरुवारी गारपीटीसह झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे निर्देश शासनाला देण्यात आलेले आहेत. तरी शासनाने तात्काळ नुकसान भरपाई शेतकऱ्यांना द्यावी आसे आवाहन ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.

पाऊस आणि गारपीटीमुळे शेतकऱ्याच्या झालेल्या नुकसानीची प्रशासनाने तात्काळ सर्व माहिती घेऊन पुढील कार्यवाही करावी त्यामध्ये बीड, वडवणी,केज, आष्टी, आणि इतर तालुक्याला ही कमी अधिक प्रमाणात याचा फटका बसला आहे शेतातील उभ्या पिकांचे नुकसान झालेआहे. आंबा, टरबूज, मोसंबी, या फळबागाचे तर मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे गहू, हरभरा, ज्वारी, कांदा, पिकाचे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावेत असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्रा. बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे



## जाहीर प्रगटनाचे उत्तर

दि.१२-०३-२०२६ रोजी दै. पार्श्वभूमी, बीड मध्ये जाहीर प्रगटन देणार कलाबाई रावसाहेब नाईकवाडे यांनी ॲड.एस.पी. लघाने, बीड यांचे वतीने दिलेल्या जाहीर प्रगटनाचे उत्तर आमचे पक्षकार हेमराज कचरूलाल समदरिया, रा. बीड हे खालील प्रमाणे देत आहेत.

मौजे गवळवाडी, ता. जि. बीड येथील गट क्र. ५७६ हा जाहीर प्रगटन देणार कलाबाई रावसाहेब नाईकवाडे यांनी चुकीचा नमूद केला असून, वास्तविक, पहाता आमचे पक्षकार हे गट नं. ५०४/३७८ मौजे पालवण, ता.व जि.बीड या जमीनीचे कायदेशीर मालक व कब्जेदार आहेत. जाहीर प्रगटन देणार कलाबाई रावसाहेब नाईकवाडे यांनी रे. दि. अपील नं. १४/२०२३ हे दाखल केले असल्याची बाब खरी असून, त्यामध्ये गट नं.५७६ या जमीनीचा समावेश नाही व आमचे पक्षकार यांचा सदर गट नं. ५७६ या जमीनीशी दुरान्वये संबंध नाही व जाहीर प्रगटन देणार कलाबाई रावसाहेब नाईकवाडे यांचा गट नं.५०४/३७८ या आमचे पक्षकाराचे जमीनीशी कसलाही दुरान्वये संबंध नाही.

गट नं.५०४/३७८ ही जमीन आमचे पक्षकार /उत्तरवादी हे विक्री करण्याचे विचारात नाहीत.

सबब हे जाहीर प्रगटनाचे उत्तर
बीड
दिनांक : २०.०३.२०२६
**मार्फत :ॲड.ए.ए.हसेगावकर,बीड.**

जाहीर प्रगटनाचे उत्तर देणार
**हेमराज कचरूलाल समदरिया**

16591


## 'माणुसकी हीच खरी जात' या विचाराने कार्य करणारे भाई विष्णुपंत घोलप–सय्यद सज्जाद

### घोलप यांच्या इफ्तार पार्टीस उस्फुर्त प्रतिसाद



पाटोदा दि २० (प्रतिनिधी)- गेल्या तीन दशकांपासून ''माणुसकी हीच खरी जात'' या विचाराने कार्य करणारे भाई विष्णुपंत घोलप हे शोषित, वंचित, पीडित व दिनदुबळया घटकांसाठी सातत्याने झटत असल्याचे प्रतिपादन सय्यद सज्जाद यांनी केले. भाई विष्णुपंत घोलप यांनी आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीत सर्व समाजाच्या लोकांकडून उस्फुर्त असा प्रतिसाद मिळाला

दर्गा मस्जिद मध्ये झालेल्या एफतार पार्टीला सर्व समाजाचे लोकांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला यावेळी मुस्लिम समाजातर्फे घोलप यांचा शाल देऊन सत्कार केला यावेळी सज्जात सय्यद यांनी विष्णुपंत घोलप संदर्भात बोलताना सांगितलेली भाई विष्णुपंत घोलप यांनी कोणत्याही जाती-पातीचा भेदभाव न करता अडचणीत सापडलेल्या नागरिकांना मदतीचा हात दिला आहे. या प्रसंगी हिंदू व मुस्लिम बांधवांनी एकत्रित बसून अत्यंत शांत व बंधुभावाच्या वातावरणात रोजा सोडत एकात्मतेचा आदर्श घालून दिला. भाई विष्णूपंत घोलप यांनी आजपर्यंत शोषित व पीडित घटकांसाठी केलेल्या कार्याचा विशेष उल्लेख करत त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. हा इफ्तार सोहळा पाटोदा शहरात सामाजिक ऐक्य व बंधुभावाचा प्रेरणादायी संदेश देणारा ठरला. या वेळी दलित मित्र एकबाल पेंटर, कॉ.महादेव नागरगोजे, पिंजारी समाजाचे नेते सादेक भाई नदाफ, दिलीपराव गाडे, शिवसेनेचे तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, काँग्रेस तालुका अध्यक्ष राहुल जाधव पाटोदा नगर पंचायतचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई, कंकरसिंग टाक, राजेंद्र मडके, पत्रकार सोमीनाथ कोल्हे शेख अजिज भाई, पत्रकार हमीदखान पठाण, पत्रकार शेख जावेद भाई, पत्रकार डॉ.हरिदास शेलार, पत्रकार शेख महेशर, बिनवडे भाऊ, आबासाहेब भोसले लाला पठाण, शेख जव्वाद बिल्डर, सय्यद वहाब भाई, सय्यद खदीर भाई, शेख इम्रान नुर, यांच्या सह बहुसंख्येने सर्वच जाती धर्मातील समाज बांधव उपस्थित होते.

## सोनी जवळा येथे झुंजार पत्रकार संघाच्या वतीने इफ्तार पार्टीला हिंदू मुस्लिम बांधवांची उपस्थिती

केज दि.२० (प्रतिनिधी) : तालुक्यातील सोनिजवळा येथील जामा मस्जिद येथे झुंजार पत्रकार संघाचे अध्यक्ष दशरथ चवरे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीला हिंदू मूस्लीम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुस्लिम धर्मियांचा पवित्र रमजान महिना हा केवळ रोजा उपवास करण्यापुरता मर्यादित नसुन तो त्याग संयम बंधुभाव शांती आणि मानवतेचा संदेश देणारा महिना आहे रमजान महिना हा आत्मासंयम त्यांग आणि शांतीचा संदेश देणारा पवित्र महिना आहे सामाजिक सलोखा आणि एकात्मतेसाठी तसेच समानतेची जाणीव करून आपआपसात बंधुभाव वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असते



या इफ्तार पार्टीला हिंदू मुस्लिम बांधवा मोठ्या संख्येने उपस्थित होते, झुंजार पत्रकार संघाचे अध्यक्ष दशरथ चवरे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या इफ्तार पार्टीला अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक मिनाज पटेल, झुंजार पत्रकार संघाचे अध्यक्ष दशरथ चवरे,व्हाइस चेअरमन हुसेन पटेल, मौलाना अब्दुल सत्तार शेख,लुकमान शेख, अकबर शेख, जावेद शेख, सज्जाद शेख,व अन्य हिंदू मुस्लिम बांधवा मोठ्या संख्येने उपस्थितीत होते, या प्रसंगी मुस्लिम बांधवांच्या वतीने झुंजार पत्रकार संघाचे अध्यक्ष दशरथ चवरे यांचा सन्मानपूर्वक सत्कार केला व मुस्लिम बांधवांना झुंजार पत्रकार संघाच्या वतीने ईद च्या शुभेच्छा दिल्या.

# पार्श्वभूमी

दि.२१ मार्च २०२६ शनिवार




## स्वा.सै.शांतीलाल जसाभाटी यांचे निधन



जामखेड दि.२०(प्रतिनिधी)- येथील संतोष आणि राजेश यांचे पिताश्री आणि सुमित याचे दादाजी स्वातंत्र्य सैनिक शांतीलाल जसाभाटी वय ९३ यांचे शुक्रवार दिनांक २० मार्च २० २६ रोजी दुपारी १२.१५ वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले आहे त्यांच्या मागे दोन मुले ,मुली ,नातवंडे, सुना असा परिवार आहे. या घटनेची माहिती समजतात सामाजिक पान २ वर

## अवकाळी पावसाने सर्वत्र नुकसान

बीड दि. २०(प्रतिनिधी):- सध्या दोन ते तीन दिवसांपासुन सुरू असलेल्या अवकाळी पावसाने सर्वत्र हाहाकार माजविला आहे. काही ठिकाणी होत असलेल्या मुसळधार पावसासोबत पडत असलेल्या गारांनी सर्व शेतकरी हैराण झाले आहे. शेतात आलेले पिकांचे यामुळे नुकसान होत असुन झाडावरील आंब्यावर देखील याचा परीणाम जाणवत आहे. त्यासोबतच अचानक आलेल्या या पावसामुळे नागरीकही त्रस्त होतांना पाहायला मिळत आहे. या पावसामुळे मात्र सर्वत्र नुकसान होतांनाचे ऐकावयास मिळत आहे.

# नमो शेतकरी योजनेत पाटोद्यात १ हजार ११२ शेतकरी वंचित राहण्याची भीती

## लँड शेडिंग, आधार शेडिंग व केवायसीतील त्रुटी ; पोखरा योजनेतही फार्मर आयडीतील चुकांमुळे शेतकरी अडचणीत

पाटोदा दि. २०(प्रतिनिधी):- पाटोदा तालुक्यात केंद्र शासनाच्या पीएम किसान सन्मान योजनेचा हप्ता २५ हजार ४९६ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाला असला, तरी राज्य शासनाच्या नमो शेतकरी योजनेत १ हजार ११२ शेतकरी वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याचबरोबर फार्मर आयडीतील त्रुटींमुळे पोखरा योजनेतही तब्बल १ हजार ११२ शेतकरी अडचणीत सापडल्याचे चित्र आहे. लँड शेडिंग, आधार शेडिंग आणि अपूर्ण केवायसीमुळे प्रशासनात मोठा गोंधळ निर्माण झाला आहे.राज्य शासनाकडून नमो शेतकरी योजनेअंतर्गत अतिरिक्त दोन हजार रुपयांचा हप्ता लवकरच जमा होण्याची शक्यता व्यक्त होत असली, तरी पात्रतेच्या प्रक्रियेत अडथळे कायम आहेत. यामध्ये केवायसी न केलेले शेतकरी, लँड शेडिंग अपूर्ण असलेली प्रकरणे तसेच बँक खात्याशी आधार जोडणी न झालेली प्रकरणे मोठ्या प्रमाणात समोर आली आहेत.तालुक्यात पीएम किसान योजनेच्या मागील हप्त्यात २६ हजार ५६८ शेतकरी लाभार्थी होते. मात्र यावेळी २५ हजार ४९६ शेतकऱ्यांनाच लाभ मिळाल्याने अनेकांच्या नोंदीत त्रुटी असल्याचे स्पष्ट झाले आहे. सध्या ६६ शेतकऱ्यांचे लँड शेडिंग प्रलंबित असून ३११ शेतकरी आधार शेडिंगसाठी प्रतीक्षेत आहेत. याशिवाय तब्बल १ हजार ४८३ शेतकऱ्यांचे फिजिकल व्हेरिफिकेशन बाकी असल्याने योजनेचा लाभ मिळण्यात अडथळे निर्माण झाले आहेत.

योजनेच्या अंमलबजावणीत कृषी व महसूल विभागांमधील समन्वयाचा अभावही प्रकर्षाने जाणवत आहे. लँड शेडिंगची जबाबदारी महसूल विभागाकडे असल्याचे कृषी विभाग स्पष्ट करत असताना, प्रत्यक्ष प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित कार्यालयात जाऊन पाठपुरावा करावा, असे आवाहन महसूल विभागाकडून करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकरी संभ्रमात सापडले आहेत.दरम्यान, नमो शेतकरी योजनेसह पीएम किसान योजनेत सुरुवातीपासूनच तांत्रिक अडचणी कायम असून, अनेक शिबिरे घेऊनही हजारो शेतकऱ्यांची प्रक्रिया अद्याप अपूर्ण आहे. परिणामी, पात्र असूनही लाभापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

फार्मर आयडीतील चुकांमुळे पोखरा योजनेवर प्रश्नचिन्ह नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोखरा) योजनेअंतर्गत पाटोदा तालुक्यातील २६ गावांचा समावेश करण्यात आला असून, आतापर्यंत ७३२ प्रस्ताव कृषी विभागाकडे प्राप्त झाले आहेत.

पान २ वर

## आ.धस यांनी तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांची घेतली भेट

### तारकेश्वर गडाच्या महंतांची प्रकृती स्थिर ; अहिल्यानगर येथे जाऊन केली

पाटोदा दि. २०(प्रतिनिधी):- आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी गुरुवारी सायंकाळी अहिल्यानगर येथील रुग्णालयात जाऊन श्री क्षेत्र तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांची भेट घेत त्यांच्या प्रकृतीची आत्मीयतेने विचारपूस केली. या भेटीत त्यांनी महंतांना धीर देत लवकर बरे होण्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.



काही दिवसांपूर्वी महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांनी स्वतःवर वार करून घेतल्याची घटना घडली होती. या घटनेत ते गंभीर जखमी झाले होते. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे अध्यात्मिक क्षेत्रासह सर्वत्र खळबळ उडाली होती. तारकेश्वर गडाला मानणाऱ्या भाविकांचा मोठा वर्ग असल्याने या घटनेनंतर चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.घटनेनंतर महंतांना तातडीने अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पान २ वर

## महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांची

## माजी आ.भीमराव धोंडे यांनी रुग्णालयात भेट घेवुन केली विचारपूस

आष्टी दि २०(प्रतिनिधी)- आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र तारकेश्वरगडाचे पूज्य महंत ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री हे सध्या अहिल्यानगर येथील लोटस (साताळकर) हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असून त्यांची आष्टी तालुक्याचे माजी आ.भिमराव धोंडे यांनी भेट घेऊन प्रकृतीची काळजी घ्यावी अशी विनंती पान २ वर



## विजतार तुटून म्हैस दगावल्या बाबत खटल्यात

## गेवराई महावितरणला कोर्टातुन दणका

गेवराई दि २०(प्रतिनिधी) -महावितरण च्या निष्काळजीपणाने विद्युत तारा तुटून अंगावर पडल्याने शेतकऱ्याच्या म्हशीचा मृत्यू झाला या संदर्भात दाखल केलेल्या दाव्यामध्ये गेवराई न्यायालयातील न्यायाधीश श्रीमती एस.एच. पाटील यांनी १७ मार्च २० २६ रोजी एक महत्वपूर्ण व मार्गदर्शक ठरणारा निकाल देत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) गेवराई यांना लुखामसला तालुका गेवराई येथील वादी शेतकरी रामनाथ सर्जेराव माळी पान २ वर

## पाटोद्यात गुरुवारी झालेल्याअवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठी नुकसान

### पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करा-संतोष जाधव

पाटोदा दि २० (प्रतिनिधी)- पाटोदा शहरात तसेच पाटोद्यातील अनेक भागात गुरुवारी झालेल्या गारपीट पावसामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून या नुकसानीचे स्थानिक प्रशासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी नगरसेवक संतोष जाधव यांनी केली आहे.





विशेष म्हणजे या झालेल्या पावसाने फळ झाडाची सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पाटोदा शहरात व तसेच अनेक तालुक्यातील अनेक भागात बुधवारी तसेच गुरुवारी अचानक झालेल्या गारपीट पावसामुळे आता तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या या कृपेने फिरवून गेला आहे गारपिटाचा पाऊस तब्बल एक तास राहिला मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची गहू हरभरा ज्वारी या पिकाची नुकसान झाले असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे या पावसाने शेतकऱ्याची अंबा इतर फळ झाडाची सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे या झालेल्या नुकसानी चे प्रशासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी नगरसेवक संतोष जाधव यांनी प्रशासनाकडे केली आहे.अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे गहू, हरभरा, मका तसेच आदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे शेतकरी दरवर्षी मोठ्या आर्थिक संकटात सापडत असतो याही वर्षी शेतकऱ्यांना संकटांचा सामना करावा लागला आहे दरम्यान, प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन लवकरात लवकर पान २ वर

## विवादित महिला आयोगाच्या अध्यक्षाप्रश्नी सत्ताधारी मुग गिळून गप्प का ?-माकप

किल्ले धारूर दि २०(प्रतिनिधी) -महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य असल्याचा वलग्ना करणारे सत्ताधारी हेच अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचे काम करत असल्याची शंका नव्हे तर विश्वास सर्वसामान्य जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. राज्य महिला आयोग महिलांचे शोषण रोखण्यासाठी की, लाडक्या बहिणींवर बलात्कार करणारांची पाठराखण करण्यासाठी ?असा प्रश्न निर्माण झाला असून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षाच्या भोंदू तांत्रिक बाबा खरात सोबतचे व्हिडीओ समाज माध्यमातून, वृत्तवाहिन्या मधून जनसामन्यात पसरत असताना धर्मांध सत्ताधारी मात्र या प्रश्नी मूकगिळून बघायची भुमीका घेत आहे.अंधश्रद्धेत लिप्त राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या तात्काळ राजीनामा घेऊन त्यांची हकालपट्टी करावी यासाठी जनवादी महिला संघटना व बीड मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने शुक्रवार दि २० रोजी धारूर तहसील कार्यालयासमोर निदर्शने केली.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की,शिव शाहू फुले आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात तथाकथित भोंदू तांत्रिक अशोक खरात याचे काळे कारणामे महाराष्ट्रासमोर उघड झाले आहेत, आणखी होत आहेत.विद्यमान काळात ही राजाश्रेयाने महिलांचे अश्लाघ्य शोषण सुरू असणे ही शरमेने मान खाली घालायला लावणारे आहे. अघोरी कृत्य व महिलांचे शोषण करणारा हा भोंदू जरी गजाआड गेला असला तरी यावर छत्रपती




शिवाजी महाराजांचे नाव घेऊन सत्तेत असलेल्या मंडळींनी गंभीर दखल घेऊन अशा समाजद्रोही, स्त्रीविरोधी प्रवृत्तीला ठेचून काढून एक शिरस्ता कायम करावा. सोबतच राज्य महिला आयोगाच्या खुर्चीवर विराजमान असणाऱ्या रूपाली पान २ वर

## तिडके क्युरसी क्लासेसचा शुभारंभ

बीड दि.२० (प्रतिनिधी):- शहरातील पांगरीरोडवर पाडव्याच्या शुभमुहूर्तावर दिनांक १९ मार्च २०२६ रोजी इंजि. प्रा. अक्षय सदाशिवराव तिडके यांच्या 'तिडके क्युरशी क्लासेस'चा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. बीड शहर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांनी शुभारंभ प्रसंगी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक, मित्र परिवारांनी क्लासेसच्या शुभारंभ निमित्त इंजि. अक्षय तिडके यांना शुभेच्छा दिल्या.उपस्थितांचे स्वागत सेवानिवृत्त उपप्राचार्य सदाशिवराव तिडके, पान २ वर






माजलगाव : शहरातील विविध भागात राजस्थानी संस्कृती मधील चैत्र नवरात्री दरम्यान चा गण गौर हा सण मारवाडी महिलांनी अतिशय उत्साह पूर्ण व आनंदी वातावरणात साजरा केला.

## मराठवाड्यातील सिंचनाचा पैसा भ्रष्टाचाराच्या खिशात-कौशिक

अंबाजोगाई दि.२०(प्रतिनिधी)-सिंचन प्रकल्पांमधील भ्रष्टाचार, साखर कारखानदारीचे राजकारण आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे होणारे दुर्लक्ष यावर कडक शब्दांत टीका करून मराठवाडा आणि विदर्भातील सिंचनासाठी येणारा पैसा भ्रष्टाचाराच्या वाटेने नेत्यांच्या खिशात गेल्यामुळे कितीतरी शेतकऱ्यांनी आपले आयुष्य संपवले, असे प्रतिपादन एबीपी माझाच्या कार्यकारी संपादक सरिता कौशिक यांनी केले.

अंबाजोगाई येथे अन्नत्याग आंदोलन अंतर्गत शेतकरी सहवेदना पुरस्कार वितरण प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी सामाजिक कार्याबद्दल माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांना 'सहवेदना पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.'अन्नत्याग आंदोलना'च्या व्यासपीठा वरून बोलताना सरिता कौशिक यांनी शेतकरी प्रश्नांवर अत्यंत टोकदार आणि भावनिक भाष्य केले. महाराष्ट्रातील पहिल्या शेतकरी आत्महत्येचे केंद्र असलेल्या साहेबराव करपे यांच्या कुटुंबाच्या




बलिदानाचा उल्लेख करत त्यांनी गेल्या तीन दशकांत व्यवस्थेत फारसा बदल झाला नसल्याची खंत व्यक्त केली. १९ मार्च १९८६ रोजी वर्धा जिल्ह्यातील चिलगव्हाण साहेबराव करपे यांनी कर्जबाजारीपणा आणि वीज कपातीला कंटाळून आपल्या पत्नी व चार निष्पाप मुलांसह सामूहिक आत्महत्या केली होती. या घटनेला ३३ वर्षे उलटूनही बळीराजाचा संघर्ष आजही सुरूच आहे, असे कौशिक यांनी नमूद केले.यावेळी कौशिक यांनी सिंचन प्रकल्पांमधील भ्रष्टाचार, साखर कारखानदारीचे राजकारण आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे होणारे दुर्लक्ष यावर कडक शब्दांत टीका केली. मराठवाडा आणि विदर्भातील सिंचनासाठी येणारा पैसा भ्रष्टाचाराच्या पान २ वर

## कनकालेश्वर महोत्सव ही बीडची खरी ओळख-त्रिदशकपूर्ती उत्सवात डॉ.क्षीरसागर यांचे प्रतिपादन

# संस्कार भारतीच्या तिसाव्या कंकालेश्वर महोत्सवाने नववर्षाचे स्वागत

बीड -गेली तीन दशके बीड जिल्ह्याची सांस्कृतिक ओळख सर्वदूर करणारा कनकालेश्वर महोत्सव ही बीडची खरी ओळख असून मोठे कलावंत देखील आम्ही या महोत्सवात कला सादर केल्याचे अभिमानाने सांगतात, आता हा महोत्सव अधिक व्यापक व्हावा असे प्रतिपादन युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

तीसावा कनकालेश्वर महोत्सव प्रतिवर्षाप्रमाणे कनकालेश्वर मंदिराच्या परिसरात आणि जलाशयातील तरंगत्या रंगमंचावर संपन्न झाला. या महोत्सवाचे उद्घाटन भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजप युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, संस्कार भारती देवगिरी प्रांताचे उपाध्यक्ष देवेंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. त्यानंतर सौ वासवदत्ता हसेगावकर आणि प्रमोद वझे यांनी संस्कार भारती गीत सादर केले.तबल्यावर सार्थक वझे तर संवादीनी वर महेश वाघमारे यांनी साथ दिली कार्यक्रमास यावेळी ज्येष्ठ नेते नवनाथ शिराळे संरक्षक भरत अण्णा लोळगे, रंगकर्मी कुलदीप धुमाळे प्रसिद्धी प्रमुख महेश वाघमारे, गटनेत्या डॉ. सारिका क्षीरसागर नगरसेवक आदित्य माने नगरसेवक शुभम धूत, नगरसेवक गोविंद शिराळे शांतिनाथ डोरले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. बीड जिल्हा हा कलाकारांचा जिल्हा आहे संस्कार भारती ने कंकालेश्वर महोत्सवाच्या माध्यमातून संस्कृती जोपासण्याचे काम केले आहे आम्ही संस्कार भारतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत असे मत यावेळी शंकर देशमुख यांनी व्यक्त केले तर डॉ. योगेश क्षीरसागर यांनी बोलताना हा कनकालेश्वर महोत्सव जागतिक पातळीवर पोहोचावा अशी अपेक्षा व्यक्त करत पक्षीय मतभेद बाजूला ठेवून क्षीरसागर परिवाराने या महोत्सवाला सदैव पाठबळ दिल्याचे सांगितले. गुढीपाडवा म्हणजे प्रभू श्रीरामांनी रावणावर विजय मिळवून आयोध्येत आगमन केल्याच्या साडेतीन मुहूर्तापैकी एक असून याच मुहूर्तावर असलेल्या संस्कार भारती बीड शाखा सातत्याने तीस वर्षे कंनकालेश्वर महोत्सव आयोजित करते हे कौतुकास्पद आहे असे गौरवोद्गार देवेंद्र कुलकर्णी यांनी काढले.





उद्घाटन समारंभानंतर तरंगत्या रंगमंचावर साई नृत्यलयाच्या वतीने सौ अनुराधा चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गणपती गणेशतालम, अष्टलक्ष्मी स्तोत्रम, शिव तांडव आणि पान २ वर

CMYK